संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २५९ * * अमरावती * रविवार, दिनांक १६ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## थोडक्यात

### हरियाणात भाजप नेत्याची गोळ्या घालून हत्या

■ **सोनीपत** : हरियाणातील सोनीपतमध्ये भाजपच्या मुंडलाना मंडळाच्या अध्यक्षांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. होळीच्या संध्याकाळी ते रस्त्यावर उपस्थित असताना, त्यांच्यावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या, त्यापैकी दोन गोळ्या नेत्याला लागल्या. जमिनीच्या वादातून ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे. गुन्हा केल्यापासून आरोपी फरार आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून प्रकरणाचा तपास सुरू केला आणि मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी खानपूर रुग्णालयात पाठवला. आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### अमृतसर मंदिरात स्फोट तरुणांनी स्फोटके फेकली

■ **अमृतसर** : अमृतसरच्या खंडवाला परिसरात असलेल्या ठाकुरद्वारा मंदिरात स्फोट झाला. हल्लेखोर मोटारसायकलवरून आलेले दोन तरुण होते, त्यांनी मंदिरावर बॉम्बसारखे काहीतरी फेकून हल्ला केला. सीसीटीव्ही व्हिडिओमध्ये हल्ला स्पष्टपणे दिसत आहे. पोलिस आयुक्त गुरप्रीत सिंह भुल्लर म्हणाले की, अशा हल्ल्यांमागे पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचा हात आहे.

सीसीटीव्हीमध्ये दोन दुचाकीस्वार दिसले आहेत, ज्यांचा शोध घेतला जात आहे. तो लवकरच पकडला जाईल. दररोज पाकिस्तानी एजन्सी आपल्या गरीब कुटुंबातील तरुणांना अशा गोष्टी करण्यासाठी प्रवृत्त करत आहेत. भूतकाळातील सोडवलेल्या प्रकरणांमध्येही, हे स्पष्ट झाले आहे की आयएसआय कमकुवत घटकांना लक्ष्य करत आहे. हल्लेखोरांनी पहिल्या मजल्यावर बॉम्ब फेकला. यामुळे मंदिराच्या पहिल्या मजल्याच्या बाहेरील भागाचे नुकसान झाले आहे.

### सीमेवरून शस्त्रास्त्रांची तस्करी



**अमृतसर** : सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी आणि पंजाब पोलिसांनी पंजाबमधील भारत-पाकिस्तान सीमेवर केलेल्या दहा संयुक्त कारवाईत शस्त्रास्त्रे आणि हेरॉइनच्या खेपेसमवेत दोन तस्करांना अटक केली आहे. जप्त केलेले खेप आणि शस्त्रे पाकिस्तानी तस्करांनी ड्रोनद्वारे भारतात पाठवली होती.

फाजिल्का जिल्ह्यात बीएसएफ टीमने दोन तस्करांना अटक करण्यात आली. तस्करांकडून दोन पिस्तूल, २३ गोळ्यांनी भरलेले ९ मिमीचे काडतूस, दोन मॅगझिन आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली.

## घोडाझरी तलावात पोहण्यासाठी उतरलेले

# पाच तरूण बुडाले

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १५ :**

चंद्रपूर जिल्ह्यात तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे पाच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

ही घटना चंद्रपुरातील नागभीड येथील घोडाझरी तलावात घडली. हे तरुण पोहण्यासाठी गेले होते. मात्र, पाण्याच्या अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. सर्व मृत युवक साठगाव कोलारी या गावातील रहिवासी आहेत. एकाच गावातील पाच जणांच्या मृत्यूमुळे खळबळ उडाली.

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड येथे घोडाझरी तलाव आहे. हा तलाव घोडाझरी धरणाचा भाग आहे. हे युवक पोहण्यासाठी तलावात उतरले. परंतु, त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. जनक गावंडे, यश गावंडे, अनिकेत गावंडे, तेजस गावंडे, तेजस ठाकरे अशी मृत युवकांची नावे आहेत.



पाचही युवक चिमूर तालुक्यातील साठगाव कोलारी येथील रहिवासी आहेत. युवकांच्या मृत्यूची बातमी समजल्यावर साठगाव कोलारी येथील ग्रामस्थांनी तलावाकडे धाव घेतली. तसेच घटनेची माहिती मिळताच पोलिसही घटनास्थळी रवाना झाले आहेत.

दरम्यान, घोडाझरी तलाव परिसर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. साठगाव कोलारी येथील युवक पर्यटनासाठी या तलावाजवळ आल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

घोडाझरी तलाव हा घोडाझरी धरणाचा एक भाग आहे. गोडाझरी नदीवर सिंचन प्रकल्पांचा भाग म्हणून हा तलाव बांधण्यात आला होता. घोडाझरी वन्यजीव अभयारण्यासाठी देखील ओळखले जाते. तलाव पक्षांसाठी महत्वाचे ठिकाण आहे. अनेक स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी या तलावावर येत असतात. तलावावर पर्यटक आणि पक्षी प्रेमी येतात. साठगाव कोलारीमधील युवकही पर्यटनासाठी याठिकाणी आले असण्याची शक्यता आहे.

## धुळवड जीवावर बेतली

### तलावात बुडून दोघांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १५ :**

रंगपंचमी खेळून काही युवक मंडळी तलावात आंघोळ करण्यासाठी गेले होते. यामध्ये दोन जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना कळंब तालुक्यातील खोरद येथील तलावात शुक्रवारी सायंकाळी घडली.

पंकज अशोकराव झाडे (३५) रा. झाडगाव तालुका राळेगाव व जयवंत पंढरी धनफुले (२८) वर्ष रा. मार्डी ता. मारेगाव अशी मृतांची नावे आहेत.

पोलीस स्टेशन कळंब हद्दीतील खोरद येथील पंकज झाडे, जयंत धनफुले यांच्यासह पवन घोटेकर रा. झाडगाव, प्रविण भोयर, सागर घोटेकर रंगपंचमी खेळून आंघोळ करण्यासाठी तलावाकडे गेले होते. त्यापैकी पोहता येत नसल्याने दोन जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

### उल्हास नदीत गेलेली चार मुले बुडाली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

बदलापूर जवळील उल्हास नदीत पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून चार मुलांचा मृत्यू झाला आहे. रंग काढण्यासाठी आणि आंघोळ करण्यासाठी हे मित्र नदीवर गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला.

या मुलांचे दहावीचे पेपर सुरू आहेत. रंग काढण्यासाठी आणि आंघोळी साठी म्हणून बदलापूर परिसरातील उल्हास नदीत गेली होती. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ही चारही मुले बुडण्याची माहिती समोर आली आहे.

## १८ जिल्ह्यांत आरोग्य केंद्रांचे सौर ऊर्जीकरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ :**



पारंपरिक ऊर्जा स्त्रोत हे मयार्दीत असल्यामुळे यापुढील काळात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवरच अधिक भर द्यावा लागणार आहे. राज्यात अपारंपरिक ऊर्जेच्या उपयोगासाठी सेल्को फाउंडेशन कार्यरत आहे. फाउंडेशनच्या सहकार्याने राज्यातील १८ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण करण्यात येणार असून सध्या आठ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे सौरऊर्जीकरण पूर्णत्वास आले आहे. तर, दहा जिल्ह्यात सौरऊर्जीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. सौरऊर्जीकरणाचे काम दोन टप्प्यात होणार असून पहिल्या टप्प्यात २५० प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम पूर्णत्वास आले असून दोन हजार प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम जून २०२६ पर्यंत पूर्ण होईल. सौर ऊर्जेच्या उपयोगामुळे राज्यात दर्जेदार आरोग्य सुविधांची उपलब्धता निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्यात नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, बुलढाणा, गडचिरोली, नागपूर, लातूर आणि वर्धा या आठ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण पूर्णत्वास आले आहे. तसेच आणखी दहा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण फाउंडेशनच्या सहकायार्ने पूर्ण करण्यात येणार असून प्राथमिक आरोग्य केंद्र ऊर्जेबाबत स्वावलंबी होणार आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले

## उड्डाणपुलावरून कोसळली कार, तरुण ठार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

जिल्ह्यातील बूटीबोरी येथे उड्डाणपुलावरून महिंद्रा ७०० कार कोसळून झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला आहे.

हा अपघात बूटीबोरी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील बूटीबोरी येथील टी-पॉईंटवर घडला. नागपूर -हैदराबाद नॅशनल हायवे आणि बूटीबोरी-तुळजापूर हायवेवरील टी-पॉईंटजवळ हा उड्डाणपूल आहे. एका कारमध्ये तीन जण वर्धेहुन चंद्रपूरला जात असतांना कार टी-पाईटहून खाली कोसळली. नागपूरकडे येताना, चालकाने चुकून चंद्रपूरकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या दिशेने गाडी वळवल्याने हा अपघात झाल्याचे तपासात समोर आले आहे.

या अपघातात अजिंक्य अभिजित श्रावणे (१८) याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची बहीण अक्षता अभिजित श्रावणे ही गंभीर जखमी झाली आहे. नागपूरच्या सदर परिसरातील



गांधी चौकात राहाणारे सक्षम बाफना, हिमांशू बाफना आणि मानस बदानी (वय २०) हे तिघे होळी निमित्त गेट-टुगेदरसाठी वर्धा येथे गेले होते.

परत येताना त्यांनी अजिंक्य आणि त्याची बहीण अक्षता यांना वर्धेतून सोबत घेतले. वर्ध्याहून नागपूरकडे येताना कार चालवणाऱ्या त्यांच्या मित्राने चुकून चंद्रपूरकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावर गाडी वळवली. रस्ता चुकल्याचे लक्षात आल्यानंतर चालक गोंधळला आणि भरधाव वेगातील कार उड्डाणपुलाच्या कठड्याला धडकून सुमारे २० फूट खाली कोसळली.

यावेळी कारमध्ये एकूण पाच प्रवासी होते, अशी माहिती बूटीबोरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रतापराव भोसले यांनी दिली. या अपघातातील जखमींना नागपूरच्या किंग्ज वे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## खापा वनपरिक्षेत्रात पट्टेदार वाघाची शिकार

### ३ वर्षीय वाघाचे अवयव नेले कापून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**

जिल्ह्यातील खापा वनपरिक्षेत्रात धक्कादायक घटना घडली आहे. कोरमेटा क्षेत्रातील सिरोंजी हद्दीतील भनगाळा नाला येथे एका पट्टेदार वाघाची शिकार करण्यात आली. शिकाऱ्यांनी ११ केव्ही वीज वाहिनीवरून लोखंडी तार आणि बांबू वापरून सापळा रचला होता.

शुक्रवारी दुपारी वनखात्याला वाघासदृश प्राणी पडल्याची माहिती मिळाली. नागलवाडीचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रवीण लेले यांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासणीत तीन ते साडेतीन वर्षांचा नर वाघ मृत आढळला. शिकाऱ्यांनी वाघाच्या मिशा, दात आणि चारही पंजे कापून नेले होते.

या प्रकरणाचा तपास सहायक वनसंरक्षक व्ही.सी. गंगावणे आणि खापा वनपरिक्षेत्र अधिकारी एस.जी. आठवले करत आहेत. पेंच व्याघ्र प्रकल्पातील श्वान पथकाची मदत घेण्यात आली आहे.



चंद्रपूरमधील वाघ शिकारीचे प्रकरण ताजे असतानाच ही घटना घडली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यात एक बछडा आणि पीसी वाघीण फासात अडकले होते. २०१६ पासून अनेक प्रसिद्ध वाघ बेपत्ता आहेत. त्यांच्याबाबत वनविभागाकडे स्पष्टीकरण नाही. या नव्या घटनेमुळे वनखात्याच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### ग्रा.पं. निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम

■ **मुंबई, दि. १५ :**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जानेवारी 2024 ते डिसेंबर 2025 या कालावधीत मुदत संपणाऱ्या राज्यातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका, तसेच चुकीची प्रभाग रचना झाल्यामुळे निवडणुका न होवू शकलेल्या ग्रामपंचायती आणि निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या सदस्य, थेट सरपंच पदांच्या पोटनिवडणुकीसाठी पारंपारिक पद्धतीने मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

यासाठी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी बुधवार, 19 मार्च रोजी प्रसिद्ध होईल. 19 मार्च ते 24 मार्च या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. 26 मार्च रोजी प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

### शिवनेरीवर १७ मार्चला शिवजयंती

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**

श्री शिवनेरी स्मारक समिती पुणेचे वतीने किल्ले शिवनेरी येथे फाल्गुन वद्य तृतीया म्हणजेच शिवतृतीयेला सोमवार, १७ मार्च रोजी सकाळी ७ वाजता शिवजयंती उत्सव सुरु होणार आहे.

शिवाई मातेस अभिषेक, शिवजन्मोत्सव, पालखी सोहळा, शिवजागर धार्मिक कार्यक्रम व पुरस्कार वितरण असे विविध कार्यक्रम गडावर होणार आहेत. उत्सवाचे यंदा ४६ वे वर्ष आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांनी दिली.

कै.ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी आणि कै.शाहीर किसनराव हिंगे यांनी १९८० सालापासून शिवनेरी गडावर हा उत्सव सुरु केलेला आहे. तीच परंपरा पुढे चालू ठेवत शनिवारी श्री शिवाई मंदिर ते जन्मस्थळ अशी महाराजांच्या प्रतिमेची चांदीच्या शिवपालखीतून सवाद्य छबिना मिरवणूक निघेल.

### कर्नाटकात सरकारी निविदांमध्ये मुस्लिम कंत्राटदारांना ४% आरक्षण

■ **वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. १५ :**

कर्नाटकचे काँग्रेस सरकार सरकारी निविदांमध्ये मुस्लिम कंत्राटदारांना ४ टक्के आरक्षण देणार आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत कर्नाटक पारदर्शकता सार्वजनिक खरेदी कायद्यात (केटीपीपी) बदल प्रस्तावित केले, ज्याला मंजुरी देण्यात आली आहे.

सार्वजनिक खरेदीमध्ये पारदर्शकता (केटीपीपी) कायद्यात सुधारणा करणारे विधेयक विधानसभेच्या या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले जाईल. विधानसभेत ते मंजूर झाल्यानंतर, कर्नाटक सरकारी निविदांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा होईल.

कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने ७ मार्च रोजी विधानसभेत अर्थसंकल्प सादर केला. या काळात, सरकारने सार्वजनिक बांधकाम विभागात ४% कंत्राटे मुस्लिम समुदायासाठी राखीव ठेवण्याची घोषणा केली होती.

## घरकुलांना मिळणार ५ ब्रास मोफत वाळू

### राज्य सरकारचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

घरकुल बांधणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. घरकुल बांधण्यांसाठी आता मोफत वाळू देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. राज्यातील घरकुल बांधणाऱ्यांना पाच ब्रास वाहू मोफत देण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची घोषणा केली आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मोफत वाळू देण्याच्या निर्णयाची घोषणा केली. याबाबत बोलताना ते म्हणाले, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत. ज्या ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लिअरन्स मिळाला आहे. त

या ठिकाणी वाळू घाटांचे लिलाव होईल. तसेच घरकुलांना पाच ब्रास मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली. आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टोन क्रशरसाठी प्रोत्साहन देत असल्याचे बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## शिंदे काँग्रेसमध्ये जाणार होते..

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काँग्रेसमध्ये जाणार होते. या संदर्भात माध्यमांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची मुलाखत घ्यायला हवी. आता अहमद पटेल हे नाहीत, ते साक्ष देण्यासाठी उपस्थित नाहीत. मात्र, अहमद पटेल यांची एकनाथ शिंदे यांच्यासोबत पहाटे काय चर्चा झाली होती, हे मला चांगलेच माहिती असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे.



खासदार संजय राऊत यांच्या या दाव्यावर बोलण्यास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी नकार दिला आहे. संजय राऊत काय म्हणाले, यासंदर्भात आपल्याला काहीही माहिती नाही, असे देखील चव्हाण यांनी म्हटले आहे.

## भांग पिवून फालतू बडबड...

शिवसेना खासदार नरेश मस्के यांनी यासंदर्भात संजय राऊत यांच्या दाव्याला प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत यांनी काल पिलेली भांग अद्याप उतरलेली नाही, असे मला म्हणता येणार नाही. कारण ते रोजच सकाळी भांग पिऊन नको त्या गप्पा मारत असतात, असे म्हणत शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी राऊत यांच्यावर टीका केली.



सतत चर्चेत राहण्यासाठी ते काहीही वक्तव्य करातात. हा त्यांचा त्यामागचा विचार असल्याचे म्हस्के यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे हे काँग्रेसमध्ये जाणार होते हे जर तुम्हाला माहिती होते, तर तुम्ही त्यांना नेते का बनवले? त्यांना नगर विकास मंत्री का बनवले? याचे उत्तर संजय राऊत यांनी द्यायला हवे, असे म्हस्के यांनी म्हटले आहे.

## पोलिसांनी नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळला

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. १५ :**

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पोस्टे कवंडे पासून १०० मीटर अंतरावर नक्षल्यांनी पुरून ठेवलेले स्फोटके पोलिसांनी नष्ट करीत नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावला.

भामरागड अंतर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पोस्टे कवंडे येथे तैनात असलेल्या विशेष अभियान पथकाच्या जवान जंगल परिसरात अभियान राबवित असताना पायवाटेवर झुडपांमध्ये लपवून ठेवलेली भरमार बंदूक मिळून आली होती. बीडीडीएस पथकाला पाचारण करण्यात आले.

पथकाने शोध अभियान सुरू



करण्यात आले. यावेळी भरमार बंदूक लपविलेल्या झुडपांशेजारी एक संशयित जागा मिळून आल्याने सदर घटनास्थळाची पाहणी केली असता जमीनीमध्ये अंदाजे दीड ते दोन फुट खोवर डोटोनेटरसाठी वापरण्यात येणाऱ्या वायरने बांधलेली प्लॅस्टीकची पिशवी मिळून आला. पिशवीची एक्सप्लोझीव्ह किटने तपासणी केली असता त्यामध्ये स्फोटक पदार्थ असल्याची खात्री झाली. सदर स्फोटक पदार्थ घटनास्थळावरच नष्ट करण्यात आले.

सदर कारवाई पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक यतिश देशमुख, एम. रमेश, सत्साई कार्तिक, भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहते यांच्या मार्गदर्शनाखाली कवंडे पोस्टेचे प्रभारी अधिकारी पोउपनि मंदार शिंदे, विशेष अभियान पथक व बीडीडीएस पथकाच्या जवानांनी पार पाडली. नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

## आयुष्मान योजनेत वृद्धांचे वय ६० पर्यंत आणणार

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १५ :**

आयुष्मान योजनेअंतर्गत मोफत उपचारांसाठी वयोमयार्दा ६० वर्षे असावी. यासोबतच, उपचारांसाठी देण्यात येणारी ५ लाख रुपयांची रक्कमही दुप्पट करून १० लाख रुपये करावी. सध्या, फक्त ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांनाच याचा लाभ मिळत आहे.

राज्यसभा खासदार राम गोपाल यादव यांच्या अध्यक्षतेखालील आरोग्य आणि कुटुंब कल्याण समितीने केंद्र सरकारला याची शिफारस केली आहे. जेणेकरून अधिकाधिक लोकांना या आरोग्य योजनेचा लाभ घेता येईल. केंद्र सरकारने गेल्या वर्षी ११ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (ABPMJAY) चा विस्तार करून ४.५ कोटी कुटुंबांमधील ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना AB-PMJA वय वंदना योजनेअंतर्गत समाविष्ट केले.

आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी विमा योजना आहे, जी



### रक्कम १० लाख करण्याची शिफारस

देशातील सर्वात गरीब ४० टक्के लोकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देते.

राष्ट्रीय आरोग्य धोरणांतर्गत, केंद्र सरकारने २०१७ मध्ये ही योजना सुरू केली. तथापि, पश्चिम बंगालसह अनेक राज्ये ही योजना स्वीकारण्यास नकार देत आहेत आणि राज्यात स्वतःची योजना चालवत आहेत.

या योजनेअंतर्गत, देशभरातील निवडक सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेता येतात. या योजनेअंतर्गत रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी आणि नंतर १० दिवसांनी झालेला खर्च देण्याची तरतूद आहे.

आयुष्मान योजनेअंतर्गत जुनाट आजार देखील समाविष्ट आहेत. आजारासाठी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च या योजनेअंतर्गत समाविष्ट केला जातो. वाहतुकीवर होणारा खर्च यामध्ये समाविष्ट आहे. चाचण्या, ऑपरेशन्स, उपचार इत्यादींचा त्यात समावेश आहे. आतापर्यंत, या योजनेअंतर्गत ५.५ कोटींहून अधिक लोकांनी उपचार केले आहेत.

# राज्यात 'पोलिसराज' आणण्याचा प्रयत्न

## सुप्रिया सुळेंचा महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायद्यावर आक्षेप



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १५ :** सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकार प्रस्तावित महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायद्याच्या माध्यमातून राज्यात पोलिसराज आणण्याच्या प्रयत्नांत असल्याचा आरोप केला आहे. सरकारने सदर कायद्याच्या माध्यमातून शासकीय यंत्रणांना अमर्यादित अधिकार प्रदान केलेत. यामुळे शासनाला राज्यात पोलिसराज प्रस्थापित करण्याचे लायसन्स मिळेल. विशेषतः या माध्यमातून शासनाच्या विरोधात असणाऱ्या, परंतु लोकशाही मार्गाने विधायक विरोध करणाऱ्यांची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे शनिवारी म्हणाल्या की, महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांनी नागरीकांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली करण्यासाठी नवे विधेयक आणायचे ठरविले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचा शासनाच्या विरोधात बोलण्याचा हक्क हिरावून घेतला जाणार आहे. वास्तविक सुदृढ लोकशाहीत विरोधी मतांचा आदर केला जातो. लोकशाहीचे तत्व विरोधी मतांना देखील महत्वाचे मानते. सत्ताधारी बेलगाम होऊ नयेत, त्यांनी जनमताचा आदर करावा याची दक्षता विरोधी आवाज घेत असतो.

### 'बेकायदेशीर कृत्य' संकल्पनेवर आक्षेप

परंतु सदर ' महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायदा' विधेयकात 'बेकायदेशीर कृत्य' ही संकल्पना स्पष्ट करताना शासकीय यंत्रणांना अमर्यादित अधिकार प्रदान केल्याचे दिसते. या माध्यमातून शासनाला 'पोलिसराज' प्रस्थापित करण्याचे लायसन्स मिळणार असून याचा दुरुपयोग शासनाच्या विरोधात असणाऱ्या परंतु लोकशाही मार्गाने, विधायक विरोध व्यक्त करणाऱ्या व्यक्ती, संस्था अगर संघटनांच्या विरोधात होऊ शकतो.

आम्ही भारताचे लोक या संकल्पनेला देखील या विधेयकामुळे हरताळ फासला जाणार आहे. प्रशासनाला अमर्याद अधिकार देण्यात येणार असल्याने कोणत्याही व्यक्तीला केवळ सूडबुद्धीने गजाआड करुन त्याला प्रताडीत केले जाऊ शकते.

शासनाची धोरणे, निर्णय यांवर टिका करणे किंवा शांततामय मार्गाने त्यासाठी निदर्शने करणे, मोर्चा काढणे बेकायदेशीर कृती म्हणून गृहित धरली जाऊ शकते. नागरीकांच्या घटनादत्त मूलभूत अधिकारांची सरळसरळ पायमल्ली होणार असून या देशातील वैचारिक विविधतेच्या तत्वांचा हे विधेयक सन्मान करीत नाही.

### घटनादत्त अधिकारांवर थेट प्रहार

एवढंच नाही तर काही ठिकाणी न्यायालयीन प्रक्रियेत देखील हस्तक्षेप करण्याचा अधिकार या विधेयकाच्या माध्यमातून शासनाला प्राप्त होणार आहे. याद्वारे न्यायपालिकेच्या सार्वभौमत्वावर देखील हल्ला करण्यात येणार आहे. या विधेयकातील काही तरतुदी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटनात्मक स्वातंत्र्य आणि न्यायपूर्ण खटल्याचा अधिकार या घटनेने प्रदान केलेल्या अधिकारांवर थेट प्रहार होणार आहे.

अशाच प्रकारचा कायदा (रौलेक्ट क्ट) इंग्रजांनी आपल्या शासनकाळात आणण्याचा प्रयत्न केला होता. संविधानाच्या मूळ तत्वांना नाकारणारे हे विधेयक असून आम्ही त्याचा तीव्र शब्दांत निषेध करतो. शासनाला विनंती आहे की कृपया या विधेयकातील मसुद्याची पुन्हा एकदा समिक्षा करुन त्या माध्यमातून संविधानत्मक मूल्यांचे हनन होणार नाही याची काळजी घ्यावी, असे सुप्रिया सुळे यांनी आपल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

# अंजली दमानिया यांची शरद पवारांवर बोचरी टीका



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १५ :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडमधील लोकप्रतिनिधींच्या कथित गुन्हेगारी कारवायांच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर बोचरी टीका केली आहे. ज्या लोकांमुळे बीडची परिस्थिती गंभीर झाली आहे, ते त्यांच्याच तालमीत मोठे झालेत, असे त्या म्हणाल्यात. शरद पवारांनी शनिवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी बीडमधील काही लोकांनी सत्तेचा गैरवापर केल्यामुळे त्याचे दुष्परिणाम गत काही महिन्यांत दिसून येत असल्याचा दावा केला होता. अंजली दमानिया यांनी त्यांच्या या विधानाचा चांगलाच समाचार घेतला. त्या म्हणाल्या, एक पंकजा मुंडे सोडल्या तर बीडमधील सर्वच नेते शरद पवार यांच्या तालमीत मोठे झालेत. म्हणजे धनंजय मुंडे असो, संदीप क्षीरसागर असो, सुरेश धस असो, जयदत्त क्षीरसागर असो किंवा बजरंग सोनवणे असो हे सर्वच जण शरद पवारांच्या तालमीत वाढलेत. त्यानंतरही शरद पवार बीडमधील परिस्थिती गंभीर असल्याचे म्हणत असतील तर या सगळ्या गंभीर लोकांना मोठे करण्यात त्यांचाच हातभार आहे हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे दमानिया म्हणाल्या. तृप्ती देसाईंकडे संशयित पोलिसांची नावे अंजली दमानिया यांनी यावेळी बीड पोलिसांनी भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांना बजावलेल्या नोटीसीवरही भाष्य केले.

# विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपमध्ये हालचाली वेगवान

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाल्यानंतर महायुतीचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यानंतर अवघ्या चार महिन्यांत राज्यात पुन्हा एकदा विधानपरिषद निवडणुका होत असल्याने भाजपसह सर्वच पक्षांमध्ये हालचालींना वेग आला आहे. विधान परिषदेतील पाच रिक्त जागांसाठी २७ मार्चला मतदान होणार असून, या निवडणुकीसाठी इच्छुकांची मोठी रस्सीखेच सुरू आहे. या पाच जागांपैकी तीन जागा भाजपला, एक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला आणि एक एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेला मिळणार आहे. मात्र, या जागांसाठी महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत आहे. भाजपच्या ताब्यातील जागांसाठी अनेक दिग्गज इच्छुक असून, विशेषतः मराठवाड्यातील एका जागेसाठी दोन प्रमुख नेत्यांची नावे चर्चेत आहेत. या निवडणुकीत भाजपचे प्रवीण दटके, गोपीचंद पडळकर, रमेश कराड, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर, आणि शिवसेनेचे आमशा पाडवी यांच्या जागा रिक्त होत आहेत. त्यामुळे नवीन उमेदवारांच्या निवडीसाठी भाजपमध्ये मोठ्या हालचाली सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका जागेसाठी तब्बल १०० जण इच्छुक असल्याची माहिती समोर आली आहे, आणि लवकरच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.भाजपच्या उमेदवारांसाठी दिल्लीदरबारी चर्चा सुरू

भाजपच्या वाट्याला आलेल्या तीन जागांसाठी अनेक नावे चर्चेत आहेत. विदर्भातील प्रवीण दटके विधानसभेत गेल्याने त्यांच्या जागी विदभार्तून कोणाला संधी मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय संदीप जोशी यांना संधी मिळेल, अशी चर्चा होती. मात्र, भाजपच्या उच्चस्तरीय बैठकीत माधव भंडारी, दादाराव केचे आणि अमरनाथ राजूरकर यांची नावे निश्चित झाली असल्याचे सूत्रांकडून कळते. भाजपच्या मराठवाड्यातील जागेसाठी लातूर अथवा धाराशिव जिल्ह्यातील एका उमेदवाराची निवड होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील भाजप नेते रमेश कराड यांच्या जागेसाठी लातूरच्या अर्चना पाटील-चाकुरकर आणि धाराशिवच्या बसवराज पाटील-मुरूमकर यांच्यात तीव्र स्पर्धा आहे.

## मालवणमध्ये आमदार निलेश राणे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य शक्तिप्रदर्शन

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी, १६ मार्च रोजी मालवणमध्ये मोठे शक्तीप्रदर्शन होणार आहे. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. आमदार राणे यांचा वाढदिवस १७ मार्चला असला तरी विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असल्याने तो १६ मार्च रोजी साजरा केला जाणार आहे. हा कार्यक्रम मालवणमध्ये मोठ्या दिमाखात पार पडणार असून, १० हजारांहून अधिक शिवसैनिक या सोहळ्याला हजेरी लावणार आहेत. या शक्तिप्रदर्शनामधून राणे बंधू आपली ताकद दाखवण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे, यानिमित्ताने शिवसेना (ठाकरे गट) आणि विरोधकांना स्पष्ट संदेश दिला जाईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. रविवारी होणाऱ्या या कार्यक्रमामुळे मालवणमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमुळे या शक्तिप्रदर्शनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवसैनिक आणि स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. राणे बंधू आणि शिंदे गटाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवण्याची ही नामी संधी असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

# राज ठाकरे भांग पिऊन बोलतात भाजपच्या कृपाशंकर सिंह यांची टीका

## मनसेने दिला कानाखाली आवाज काढण्याचा इशारा



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १५ :** राज ठाकरेंना आपण काय बोलत आहोत, उद्या काय बोलणार आहोत? हे त्यांना कळत नाही. मला वाटतं राज ठाकरे सकाळी-सकाळीउठून भांग वगैरे असे काही तरी घेतात, आणि भांग पिऊन मस्त राहातात, अशी टीका भाजपचे नेते कृपाशंकर सिंह केली आहे. दरम्यान तुमची लायकी नाही राज ठाकरे साहेंबावर टीका करायची आणि जो कोणी राज ठाकरे यांच्यावर वैयक्तिक टीका करेल त्याच्या कानाखाली आवाज निघेल असे म्हणत कृपाशंकर सिंह यांच्या या टीकेवर मनसेकडून देखील जोरदार पलटवार करण्यात आला आहे.

### कृपाशंकर सिहांचे वक्तव्य काय ?

कृपाशंकर सिंह म्हणाले की, राज ठाकरे काही बोलले तर समजेल की त्यांना वेड लागलंय. त्याला कधी कळलेच नाही की आज काय बोलले आणि उद्या काय बोलले. मला वाटते राज ठाकरे सकाळी उठल्यानंतर भांग घेतात. भांग घेऊन मस्त राहतात. संध्याकाळी ये माझ्या बांधवानो. माझ्या मनसैनिकांनो काहीतरी करा आणि ते काय वेगळं करतात समजत नाही. त्यांना पण भांग पाठवतो.

### खोपकरांनी लायकीच काढली

अमेय खोपकर म्हणाले की, कृपाशंकर सिंहला इशारा देण्याइतका तो काही मोठा राजकारणी नाहीये. त्याची पात्रता नाहीये. राज ठाकरे म्हणतात, तसे कृपाशंकर सिंह हा एक फेरीवाला आहे. आज या पक्षात, तर उद्या त्या पक्षात. राज्यात सगळीकडे धुळवडीचा उत्साह आहे. सगळे मज्जा करताय. कशाला उगीच गलिच्छ राजकारण करायचं?, असा सवाल करत अमेय खोपकर यांनी केला आहे. तर तुमची लायकी नाही राज ठाकरे साहेंबावर टीका करायची आणि जो कोणी राज ठाकरे यांच्यावर वैयक्तिक टीका करेल त्याच्या कानाखाली आवाज निघेल, असा इशारा खोपकर यांनी दिला आहे.

# संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये तळीरामांनी लावली आग

## अर्धा हेक्टर जंगल जळून खाक, पोलिसांकडून तपास सुरू




■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १५ :** मुंबईच्या बोरिवलीमधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये तळीरामांनी आग लावली आहे. होळीनिमित्त मोठ्या संख्येमध्ये तळीराम संजय गांधी राष्ट्रीय उद्यान जंगलालगत असलेला दहिसर परिसरात गेले होते. संध्याकाळी सहाच्या सुमारास दहिसर नॅशनल पार्कच्या जंगलामध्ये अचानक मोठे आगीचे लोट दिसून आले. प्राथमिक माहितीनुसार ही आग तिथल्या तळीरामाकडून लावण्यात आली आहे. दरम्यान ही आग तळीरामांकडून लावण्यात आली होती. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचा पाच गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मोठे प्रयत्न करून अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग आटोक्यात आणली. जवळपास दीड तास या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाला लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्यावेळी ही आग लावण्यात आली, त्यावेळी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे सुरक्षारक्षक उपस्थित होते. मात्र, आगीचे लोट दिसल्यानंतर घटना उघडकीस आली. वनवा लागण्याची घटना ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या रावलपाडा नियत क्षेत्रातील सर्वे नं. ३४५ ब मधील असून संध्याकाळी ६.३० च्या सुमारास लागलेली आग ही ८ वाजता कु. उ. बो. वनक्षेत्र अधिकरी, वन कर्मचारी आणि रॅपिड टीमच्या प्रयत्नाने पूर्णपणे विझविण्यात आली.

### पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू

या घटनेबद्दलचा अधिक तपास आता पोलिसांकडून केला जातोय. संबंधित लोकांवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. होळीनिमित्त शहरामध्ये पोलिसांचा तगडा बंदोबस्त बघायला मिळाला. जागोजागी पोलिसांकडून तपासणी केली जात होती. लोक होळी खेळण्यासाठी मोठ्या संख्येने घराबाहेर पडले होते.

बदलापूर शहरातील चामटोली जवळच्या पोद्दार गृह संकुलात ही चारही मुले राहत होती. ही मुले दहावीच्या वर्गात शिकत असल्याची माहिती देखील समोर आली आहे. या मुलांचे दहावीचे पेपर सुरू आहेत. आता त्यांचे केवळ दोनच पेपर अद्याप बाकी आहेत. मात्र धुळवड असल्याने ही मुले रंग खेळली आणि रंग काढण्यासाठी आणि आंघोळी साठी म्हणून बदलापूर परिसरातील उल्हास नदीत गेली होती. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ही चारही मुले बुडण्याची माहिती समोर आली आहे.

### विरोधकांनी पाच वर्षे आराम करावा

## मंत्री गिरीश महाजन यांचा एकनाथ खडसेंना टोला



**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील कट्टर राजकीय विरोधक असलेले एकनाथ खडसे आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यातील वाद महाराष्ट्राला माहितीच आहे. त्यातच धुळवड निमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांना टोला लगावला आहे. राज्यात विरोधक शिल्लक राहिलेले नाहीत. जे शिल्लक राहिले आहेत त्यांनी पाच वर्षे आराम करावा, असा सल्ला गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांना दिला आहे. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्या प्रकरणी पोलिस आरोपींना संरक्षण देत असल्याचा आरोप एकनाथ खडसे यांनी केला होता. मात्र आरोपींवर कठोर कारवाई व्हायला पाहिजे, हेच आमचे पहिल्यापासून मत आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे कोणाला वाचवले जात आहे, या आरोपात काहीही तथ्य नसल्याचे गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

## दुधाच्या दरात दोन रुपयांची वाढ

### गाईचे दूध प्रतिलिटर ५८ रुपये तर म्हशीचे दूध प्रति लिटर ७४ रुपये



**मुंबई :** राज्यातील दुधाच्या दरात आजपासून दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आज सर्वसामान्य नागरिकांना दूध दरात दोन रुपये अधिकचे द्यावे लागणार आहे. त्यामुळे आता गाईचे दूध प्रतिलिटर ५८ रुपये तर म्हशीचे दूध प्रति लिटर ७४ रुपयाला मिळणार आहे. पुण्यात कात्रज दूध संघाच्या मुख्यालयात झालेल्या सहकारी आणि खासगी दूध संघाच्या शिखर संस्था असलेल्या दूध उत्पादक आणि कल्याणकारी संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. दूध संघाच्या या निर्णयामुळे पुणे आणि मुंबई परिसरातील दुधाच्या दरात वाढ झाली आहे. बाकी इतर राज्यात देखील हळूहळू ही दरवाढ दिसून येईल. या निर्णयानुसार आजपासून दुधाच्या किमती दोन रुपयांनी वाढवण्यात आल्या आहेत. दूध संघटनांनी सर्वांनी एकत्र येऊन हा निर्णय घेतला आहे. मात्र हा निर्णय सर्वसामान्य व्यक्तींच्या खिशाला कात्री लावणारा आहे, असे मत ग्राहकांनी व्यक्त केले. दुधाचे दर आम्हाला परवडणारे नाहीत, याचा सर्वांनी विचार करायला हवा, असे देखील काही ग्राहक म्हणत आहेत.

सध्याची महागाई पाहता दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून दुधाच्या किमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती दूध उत्पादक आणि कल्याणकारी संघाचे सचिव प्रकाश कुतवळ यांनी दिली आहे. या संदर्भात एकमताने घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दुधाच्या दरात दोन रुपये प्रति लिटर मध्ये वाढ करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व सहकारी आणि खासगी दूध उत्पादक संस्थांनी मिळून हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हे दर सर्वच ठिकाणी लागू होतील, असे देखील ते म्हणाले.

भेसळखोरांवर कडक कारवाई करण्याची एकमुखी मागणी

यावेळी राज्यात भेसळयुक्त पनीरची विक्री होत असल्याबद्दल देखील चर्चा झाली. याबाबत भेसळखोरांवर कडक कारवाई करण्याची एकमुखी मागणी या बैठकीत दूध संघाच्या प्रतिनिधींनी केली आहे. राज्यात दुधाचे संकलन आता सकाळ आणि संध्याकाळ असे दोन वेळा करण्याचा निर्णय देखील या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार आता शेतकऱ्यांकडून दोन वेळा दूध संकलन होणार आहे. मात्र दुसरीकडे भेसळयुक्त पनीर संदर्भात महासंघाने आक्रमक भूमिका घेत यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.


| दिवस | कल्याण बाजार | मुंबई बाजार | सर्व बाजारासाठी |
|---|---|---|---|
| सोमवार १७ मार्च २०२५ | २४५ ३८० ४७० **१** २४६ ३९० ४८० **२** ५०० ६९० ४५६ **५** ३५० ४४० ५५८ **८** | २६६ ६९९ ३४७ **४** १५९ २५८ ३५७ **५** ११४ २७७ ३३० **६** ४७८ ५६७ ६६७ **९** | ३१ ६१ ७८ ०८ / ३२ ६२ ७९ ०४ / ३५ ६५ ७४ ०९ |
| | **जोडी** १० २० ५३ ८३ / ११ २१ ५४ ८४ / १७ २७ ५६ ८६ | **जोडी** ४० ५० ६३ ९३ / ४१ ५१ ६८ ९८ / ४२ ५२ ६७ ९७ | १२० २६८ २५० २४४ / ३०० ३६७ ३४० १९० / ४९० ४६६ ७८० ३७० |
| मंगळवार १८ मार्च २०२५ | ३४५ ६६० २०० **२** १२० ३०० ४९० **३** १५० २६८ ३६७ **६** १४४ २७८ ३७९ **९** | १३८ ३४५ ६७९ **२** ४४७ २४९ ३५७ **५** ३५८ ७९० १२३ **६** १२४ २७८ ४६७ **७** | ११ ४९ ७२ ८२ / १३ ४३ ७० ८० / १५ ४५ ७६ ८६ |
| | **जोडी** २४ ३४ ६१ ९१ / २० ३० ६५ ९५ / २८ ३८ ६७ ९७ | **जोडी** २१ ५१ ६९ ७९ / २३ ५३ ६० ७० / २४ ५४ ६८ ७८ | २९० १५८ १२४ १८९ / ३८० ३४७ २७८ ३७८ / ४७० २२० ४६७ २६० |
| बुधवार १९ मार्च २०२५ | ६७० ५८० ४९० **३** १४९ २५७ ७८९ **४** १६८ ३४८ ७८० **५** २५० ३६८ ४६७ **७** | २०० ४८० ५७० **२** ३३८ ११२ २३९ **४** १६० २५० ३४० **७** १८९ ४५९ ३६९ **८** | २१ ५१ ८६ ९६ / २० ५० ८४ ९४ / २७ ५७ ८३ ९३ |
| | **जोडी** ३९ ४९ ५२ ७२ / ३० ४० ५६ ७६ / ३१ ४१ ५९ ७९ | **जोडी** २३ ४३ ७१ ८१ / २५ ४५ ७९ ८९ / २६ ४६ ७० ८० | २२८ ११३ १२५ १९९ / ३३६ ४४७ २७९ २८९ / ४९९ ७९९ ४६८ ३७९ |

कल्याण, मिलन डे, मेन बाजार, मिलन नाईट, राजधानी तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


### विहिरीत पडलेल्या बिबट्याला वन विभागाची मदत

**मानोरा:** हातोली येथील एका शेतातील विहिरीत पडलेल्या बिबट्याची वन विभागाने अत्यंत शिस्तबद्ध व तातडीच्या कारवाईने सुखरूप सुटका केली. या धडाकेबाज बचाव मोहिमेत वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अतिशय समन्वयाने काम करत या वन्य प्राण्याला कोणतीही इजा न होता जंगलात सोडून दिले आहे. गावातील शेतकरी सकाळी त्यांच्या शेतावर गेले असता, त्यांना विहिरीत बिबट्या पडल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ वन विभागाला माहिती दिली. यानंतर वन विभागाने घटनास्थळी धाव घेतली आणि बचाव कार्य सुरू केले. अथक प्रयत्नानंतर तब्बल तीन तासांच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. वैद्यकीय तपासणीनंतर बिबट्याला सुरक्षित जंगलात सोडण्यात आले. या मोहिमेत शेख मुखबीर, शेख गुलाब, गिरीश डांगे, संदीप राठोड, किरण, तेजस, अश्विन राठोड, गिराम, वन कर्मचारी, वनपाल सोनवणे, एस एस पी राठोड, एम बी शिरसाट, व्ही बी चतुरकर, वनरक्षक सीमा पांडे व इतर वन कर्मचाऱ्यांनी भूमिका बजावली. ही मोहिम राबवण्यासाठी गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते.

## समृद्धी महामार्गावर रुग्णवाहिकेला अपघात, महिला ठार, ६ जखमी

**नाशिक:** रुग्णवाहिकेच्या चालकाचे नियंत्रण सुटून १ महिला ठार, तर ६ जण जखमी झाल्याची दुर्दैवी घटना समृद्धी महामार्गावरील धामणगाव शिवारात शुक्रवारी पहाटे ४.३० च्या सुमारास घडली आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, अपघातग्रस्त रुग्णवाहिका छत्रपती संभाजीनगरहून मुंबईकडे एका बालकाला उपचारासाठी घेऊन जात होती. ही रुग्णवाहिका धामणगाव परिसरातील समृद्धी महामार्गावरील ६०५.२ मुंबई लेनवर आली असताना चालकाचे अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे रुग्णवाहिका विरुद्ध बाजूच्या डिव्हायडरला धडकली. हा अपघात एवढा भीषण होता की, डिव्हायडरला धडकल्यानंतर रुग्णवाहिका ४ ते ५ वेळा उलटली.

## झटपट पैसे कमावण्याच्या उद्देशाने

### माजी नगरसेवकाकडे ५० लाख रुपयांची खंडणी

**मुंबई:** बदलापूर येथील माजी नगरसेवक शैलेश वडनेरे यांना धमकी देत त्यांच्याकडे ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शैलेश वडनेरे यांनी बदलापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. झटपट पैसे कमावण्याच्या उद्देशाने बदलापूर मधील चार आरोपींनी हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बदलापूर मधील माजी नगरसेवक शैलेश वडनेरे यांना महिना भरापूर्वी एका अज्ञात नंबर वरून व्हॉट्सअप वर व्हिडिओ कॉल आला होता. या व्हिडिओ कॉल मध्ये शैलेश वडनेरे यांच्या अश्लील फोटो होते. तसेच हे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देतो त्यांच्याकडे ५० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली. मात्र सुरुवातीला वाडनेरे यांनी याकडे लक्ष दिले नाही. त्यांना हा खेडसाळपणा वाटला. मात्र वारंवार खंडणीची मागणी केली गेल्यानंतर त्यांनी बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात याबाबत अधिकृत तक्रार दाखल केली.

सदरील तक्रारीनंतर पोलिसांनी देखील तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. त्यानंतर समोर आलेल्या पुराव्यानुसार चार आरोपींना अटक करण्यात आली. यामध्ये अक्षय जाधव, रोहित आडारकर, दीपक वाघमारे आणि पुष्कर कदम यांचा समावेश आहे. या चौघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना १५ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. अधिक तपास सुरू आहे.

# चांदूर रेल्वेच्या सेंट्रल बँकेत शॉर्टसर्किटने भीषण आग

**लाखोंचे साहित्य जळून खाक**

**4 अग्निशमन वाहनांनी विझविली आग**

**महत्वाचे दस्ताऐवजही जळाले**







**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.15 )**- चांदूर रेल्वे येथील आठवडी बाजार स्थित सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या इमारतीला शनिवारी (ता. 15) सकाळी 11.45 वाजता आग लागली. या आगीमुळे बँकेतील लाखो रुपयांचे वस्तू, फर्निचर भस्मसात झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी दुपारी 4 वाजतापर्यंत शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. सर्व्हर रूममधील एसीच्या शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या आगीत जीवितहानी झालेली नाही. आग लागताच बँकेतील 7 कर्मचारी व ग्राहक आपला जीव वाचवित बँकेबाहेर पडले. या घटनेत लॉकर पुर्णपणे सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे

सेंट्रल बँकेच्या चांदूर रेल्वे येथील शाखेत शनिवारी नियमित कामकाज सुरू असतांना सकाळी 11.45 वाजताच्या सुमारास सर्व्हर रूममधून धूर निघत असल्याचे निदर्शनास येताच पळापळ झाली. कर्मचाऱ्याने फायर एक्सटिंग्युशर सिलेंडरने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आग विझली नाही. त्यामुळे ग्राहक आणि बँकेतील कर्मचारी लगेच बाहेर पडले. आगीने काही क्षणातच रौद्र रुप धारण केले. आगीच्या घटनेची माहिती चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले. आग आटोक्यात येत नसल्याचे पाहून अमरावती, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे येथून अग्निशमन दलाच्या वाहनाला सुध्दा पाचारण करण्यात आले. दुपारी 4 वाजताच्या दरम्यान सदर आग ही पुर्णत: आटोक्यात आली. या आगीत जिवितहानी झालेली नसली, तरी बँकेतील महत्वाची कागदपत्रे, कॉम्प्युटर, फर्निचर व इतर साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी देखील तत्काळ पोहचून बंदोबस्त वाढविला होता. घटनास्थळी तहसिलदार पुजा माटोडे, मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे, ठाणेदार अजय आकरे, पीएसआय नंदलाल लिंगोट, पीएसआय सुयोग महापुरे व सेंट्रल बँकेचे वरिष्ठ अधिकारी पोहचले होते. बँकेतील एसी मध्ये शॉर्टसर्किट झाले आणि तेथून ही आग पसल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीत नेमके मालमत्तेचे किती नुकसान झाले, याची माहिती अद्याप मिळू शकली नाही. या आगीच्या घटनेने चांदूर रेल्वे येथे पाच-सहा वर्षापुर्वी लागलेल्या भीषण आगीच्या आठवणी ताज्या केल्या आहेत. 29 एप्रिल 2019 रोजी चांदुर रेल्वे-अमरावती मार्गावरील ढोले कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस असलेल्या अंबिका हॉटेलच्या किचन रूममधील गॅस सिलेंडरला भिषण आग लागली होती. या आगीत खाद्यपदार्थ तयार करण्याचे साहित्य जळून गेले होते. मात्र, सुदैवाने यात कोणतीही जीवीतहानी झाली नव्हती. ही आठवणी यानिमित्य ताजा झाली.

### बँकेतील लॉकर सुरक्षित

सेंट्रल बँकेतील लॉकर आणि इतर ग्राहक निधी बँकेकडे पूर्णपणे सुरक्षित आहेत. ऑनलाइन बँकिंग सुविधा सुध्दा सुरू आहे. ग्राहकांची कोणतीही गैरसोय नाही याची काळजी घेतल्या जाणार आहे.

**प्रविण रंभाड,**
**सेंट्रल बँक कर्मचारी,**
**रिजनल विभाग अमरावती**

### चांदूर रेल्वे न.प.चे अग्निशमन दलाचे वाहन पोहोचले उशिरा

सदर आगीची माहिती त्वरित चांदूर रेल्वे नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाला देण्यात आली. सदर अग्निशमन वाहन हे बँकेपासून केवळ पाच मिनिटाच्या अंतरावर होते. परंतु हे वाहन घटनास्थळाकडे निघताच रस्त्यात मधातच सरदार चौकाजवळ नादुरुस्त झाले. त्यामुळे जवळपास 15 मिनिटे वाहन तेथेच उभे होते. मात्र तोपर्यंत सदर आगीने रौद्ररूप धारण केले होते. 15 मिनीटांनी वाहन दुरुस्त होताच घटनास्थळी पोहोचले. यानंतर लगेच अमरावती, धामणगाव व नांदगाव येथील वाहन सुध्दा पोहचले होते.

### अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना फायर सेफ्टी किट नाही

चांदूर रेल्वेच्या नगर परिषदच्या अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना आग विझवितेवेळी मोठ्या अडचणींना सामना करावा लागल्याचे चित्र पहावयास मिळाले. सदर कर्मचाऱ्यांकडे फायर सेफ्टी किट सुध्दा नव्हती. त्यामुळे सदर फायर कर्मचाऱ्यांचे डोळे पुर्ण लाल होऊन डोळ्यातून पाणी येत होते. त्यांच्याजवळ केवळ हेल्मेट आणि बुट दिसले. असे असले तरी या फायर कर्मचाऱ्यांनी जीवाचे रान करीत पुर्ण आतमध्ये जाऊन आगीवर नियंत्रण मिळविले. यात चांदूर रेल्वेच्या काही फायर कर्मचाऱ्यांची तब्येत सुध्दा बिघडल्याची प्राथमिक मिळाली आहे.

### बँकेजवळ इमर्जन्सी नंबर सुद्धा नाही

सेंट्रल बँकेजवळ वेळेवर इमर्जन्सी नंबर सुद्धा नसल्यामुळे बँकेचे मॅनेजर हे आग लागताच थेट नगरपरिषद कार्यालयात याची माहिती देण्यासाठी गेले होते अशी माहिती एका ग्राहकाने दिली. बँक मॅनेजर यांनी आग लागताच ते विझविण्यासाठी वेळीच समयसुचकता दाखवली असती तर आग ऐवढी मोठी झाली नसती अशी चर्चा बँक परिसरात एकावयास मिळत होती.

# रंगपंचमीला फनलॅन्डमध्ये तरुणांमध्ये हाणामारी

## आयोजकांवर गुन्हा दाखल



### रेणुका लॉनमध्ये परवानगीशिवाय कार्यक्रम

राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील बडनेरा रोडवर असलेल्या रेणुका लॉनमध्ये सार्थक राजेंद्र याऊल (21, साईनगर) याने रंगपंचमीचा कार्यक्रम विनापरवाना आयोजित केला होता. मोठा आवाज झाल्याने पोलिसांचे पथक तेथे पोहोचले. कार्यक्रमासाठी सार्थक नामक तरुणाकडे परवानगीचे पत्र मागितले असता कोणतीही परवानगी दाखवण्यात आली नाही. आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सार्थकवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 )**- रंगपंचमीच्या दिवशी आयोजित कार्यक्रमात सुविधा न मिळाल्याने तरुणांमध्ये हाणामारी झाली. ही घटना मार्डी रोडवरील फनलँडमध्ये शुक्रवारी घडली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून सौम्य बळाचा वापर करून प्रकरण शांत केले. पोलीस हवालदार मंगेश निरंजन राऊत यांच्या फिर्यादीवरून गाडगेनगर पोलिसांनी आयोजक प्रशिक सुनील चव्हाण (27, रा. अशोक नगर, नवीन वस्ती बडनेरा) आणि सागर रवींद्र यादव (25, रा. नवीन वस्ती बडनेरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गाडगेनगर पोलिसांना 8 मार्च रोजी फनलँडमध्ये रंगपंचमीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सागर यादव यांच्या नावाने लिहिलेला अर्ज प्राप्त झाला होता. मात्र आयोजकांना कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आली नाही. असे असतानाही हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आयोजकांनी होळी उत्सवाची तिकिटे सर्वसामान्यांना विकून कार्यक्रम आयोजित केले. त्यामुळे शुक्रवारी फनलॅन्डमध्ये तरुणांसह मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. मात्र येथील तरुणांची गैरसोय होत असल्याने त्यांनी आक्षेप व्यक्त करत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. याबाबतची माहिती गाडगेनगर पोलिसांना मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान काही लोकांनी एका तरुणाला मारहाण केली. तरुणांमध्ये वाढता रोष पाहून पोलिसांनीही सौम्य बळाचा वापर केला. त्यामुळे जमाव पांगला. त्यामुळे पोलिसांनी विनापरवानगी कार्यक्रमाचे आयोजन केल्याप्रकरणी आरोपी प्रशिक सुनील चव्हाण आणि सागर यादव यांच्यावर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### चाकू घेऊन दहशत धुमधाम करणाऱ्याला चोपले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 )**-सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चित्रा चौकात चाकू घेऊन दहशत पसरविणाऱ्या चार तरुणांना नागरिकांनी चोप दिला. याप्रकरणात पोलिसांनी आरोपी शुभम अशोक साहू (25, रतनगंज), नितेश राजेश साहू (25, रतनंज, दुसरा नागोबा), हर्ष शाम साहू (23, मच्छीसाठ) आणि गौरव राजेश साहू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शहर कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार रफिक खान रशीद खान हे 14 मार्च रोजी दुपारी 2.15 वाजता इतर कर्मचाऱ्यांसह गस्त घालत होते. यावेळी चित्रा चौकात चार युवक चाकूचा धाक दाखवून लोकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी दहशत निर्माण करणाऱ्या चार तरुणांना काही लोक मारहाण करत होते. त्यामुळे पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी शुभम साहू, नितीन साहू, हर्ष साहू आणि गौरव साहू यांना ताब्यात घेतले. यामध्ये एक आरोपी गर्दीचा फायदा घेत पळून गेला. पोलिसांनी तिन्ही आरोपींना पोलिस ठाण्यात आणले. त्यानंतर पोलीस कर्मचारी रफिक खान यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# चाकुचा धाक दाखवून वाटमारी करणारे दोघे अटकेत

## सिटी कोतवाली पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )**- चाकुचा धाक दाखवून लाथाबुक्यांनी मारहाण करीत एका तरुणाजवळील पैसे हिसकाविणार्या दोन आरोपींना सिटी कोतवाली पोलिसांनी 14 मार्च रोजी अटक केली. क्रीष्णा संतोष श्रीवास (वय 22 वर्ष) व भुषण मुकेश श्रीवास (वय 25 वर्ष, दोन्ही रा. बिजासेन मातामदीरा जवळ, मसानगंज, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून मोपोड ॲक्टीवा वाहन क्रमांक एमएच 27 बीएस 1852 (किमंत 70000 रुपये), गुन्हात वापरलेला एक स्टील चाकु व 1300 रुपये असा एकूण 71 हजार 350 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

13 मार्च रोजी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात रेहामुल खान शारुक खान (वय 20 वर्ष, रा. डायमंड हर्बल सिम बेडीया, जिल्हा दंख्खन चोविस परगना, पश्चिम बंगाल, हल्ली मुक्काम गवळीपुरा, अमरावती) यांनी फिर्याद दिली की, 13 मार्च रोजी रात्री 10.30 वाजता ते एका कारखान्यातून शिलाई मशिनचे काम करुन घरी गवळीपुरा येथून पायदळ जात होते. त्यावेळी त्यांच्यासोबत मित्र मेहबुब आयनुल गाझी शकिल सैफुला गाझी हा सुध्दा होता.

दरम्यान गुप्ता हॉस्पीटलसमोर कृष्णा श्रीवास (रा. मसानगंज) व त्याचा एक मित्र हे अचानक समोर आले आणि त्यांनी रेहामुल खानला अश्लिल शिविगाळ करून या रस्त्याने ये-जा करायचे असेल, तर मला पैसे दयावे लागेल. अशी धमकी देऊन त्यांनी रेहामुल खानला लाथाबुंक्यानी मारहान केले. त्यानंतर क्रुष्णा श्रीवासने खिशातुन चाकु काढुन रेहामुल खानला मारण्याची धमकी दिली आणि त्याच्या खिशातुन जबरीने 1700 रुपये काढले. त्यांनी पैसे काढण्यास विरोध केला असता त्या दोघांनीही रेहामुल खानला लाथाबुक्यांनी मारहाण करुन खाली पाडले. त्यानंतर या रस्त्यानी पुन्हा दिसले, तर जिवाने मारुन टाकील, अशी धमकी दिली. या घटनेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. गुन्ह्याचा तपास करित असताना पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी 14 मार्च रोजी गुप्त माहितीच्या आधारे आरोपी क्रीष्णा संतोष श्रीवास व त्याचा मित्र भुषण मुकेश श्रीवास यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून मोपेड वाहन, चाकु व 1300 रुपयांची रोख असा एकुण 71 हजार 350 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून, गुन्हा उघडकीस आणला. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत भवर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक मनोहर कोटनाके, विजया पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विजय गिते, रंगराव जाधव, पोलिस हवालदार मलीक अहेमद, प्रमोद हरणे, पंकज अंभोरे, आकाश इंगोले, मोनल तिडके यांनी केली.

# आज वरुड येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक

**मुक्ता दाभोळकर यांची उपस्थिती**



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.15 )** - सामाजिक कार्यकर्त्या आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या ॲड. मुक्ता दाभोळकर रविवार (दि.16) ला सायंकाळी 5 वाजता देशबंधूदास वाचनालयाच्या मागे अनिल देशमुख यांच्या घरी वरुड येथे येणार असल्यामुळे महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी एका बैठकीचे आयोजन केले आहे. तरी या बैठकीला निमंत्रितांनी व समविचारी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अश्वमपाल वानखडे, सचिन परिवार व अनिल देशमुख यांनी केले आहे. या बैठकीमध्ये तालुका व शहर कार्यकारिणीची निवड केल्या जाणार आहे.

तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाकरिता कार्यकर्त्यांना मार्गदर्शन म्हणून मुक्ता दाभोळकर करणार आहे. शहरातील देशबंधू दास वाचनालयाच्या मागे अनिल देशमुख यांच्या घरी उपस्थित रहावे, बैठकीला प्रामुख्याने मुक्ता दाभोळकर यांच्या सोबत पुणे येथील राज्य कार्यकारिणी सदस्य मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव आणि मुंबई येथील प्रा.प्रवीण देशमुख उपस्थित राहणार आहेत. तरी या बैठकीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भावी पतीला फोटो पाठवून मुलीची बदनामी

## प्रियकरावर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )** - अंजनगावसुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 23 वर्षीय तरुणीच्या प्रियकराने तिच्या भावी पतीला फोटो पाठवून बदनामी केली. पिडित तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी 14 मार्च रोजी आरोपी त्रिशरण धोंडू खराटे याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सुत्रानुसार, तक्रारदार 23 वर्षीय तरुणीची स्पर्धा परीक्षेच्या वर्गात आरोपी त्रिशरण याच्याशी भेट झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये तीन वर्षे प्रेमसंबंध होते. मात्र त्रिशरण तरुणीवर संशय आला. त्यामुळे तरुणीने संबंध तोडले. मात्र तरीही आरोपी त्रिशरण हा तरुणीला फोन करून त्रास द्यायचा. दरम्यान, तरुणीचे लग्न टाकरखेडा मोरे येथील रहिवासी तरुणाशी जुळले. यानंतर आरोपी त्रिशरण याने तरुणीला फोन करून तिला त्रास दिला. माझ्याशी लग्न कर अन्यथा मी तुझे लग्न मोडीन, तुझे व माझे फोटो तुझ्या कुटुंबीयांना व वराला पाठवून देईन, अशी धमकी त्याने तरुणीला दिली. यानंतर 13 मार्च रोजी भावी पती घरी आला आणि व्हॉट्स ?पवर आरोपी त्रिशरण खराटे याने फोटो पाठविल्याचे सांगितले. त्यानंतर तरुणीने अंजनगावसुर्जी पोलीस ठाणे गाठून आपली बदनामी करण्याच्या उद्देशाने फोटो पाठवल्याची तक्रार दिली. पोलिसांनी त्रिशरण खराटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# बेचो तुम्हारा जोरु को.. देव हमारा फगवा..



**मारोती पाटणकर**


**चुरणी,( दि.15 )**- सध्या मेळघाटातील काटकुंभ, हतरू परिसरात तसेच टेंभूसोंडा, हरीसाल अशा अनेक भागांमध्ये आदिवासी बांधव फगवा मागत असून यादरम्यान आदिवासी महिला बोली भाषेतील गीत सादर करतात. बेचो तुम्हारा बहन को.....देव हमारा फगवा...बेचो तुम्हारा जोरू को देव हमारा फगवा.......असे गीत सादर करत फगवा (पैसे) मागताना दिसत आहे.



चिखलदरा व धारणी ही तालुके दोन्ही तालुके आदिवासी बहुल तालुके असून आदिवासी बांधवांचा या ठिकाणचे आदिवासी बांधवांचा होळी हा सगळ्यात मोठा सण असून आदिवासी बांधव हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. होळी साजरी झाल्यानंतर पाच दिवस आदिवासी बांधव रंगपंचमी खेळतात. या पाच दिवसाला आदिवासी बांधव पंचमी असे म्हणतात. या पाच दिवसांमध्ये पाचही दिवस रंग खेळतात हे विशेष. यासोबतच या पाच दिवसांमध्ये आदिवासी बांधव इतर लोकांकडून होळीनिमित्त आपला हक्क मागतात. यासाठी आदिवासी बांधव रस्त्यावर उभे राहून रस्ता अडवून येणारा जाणारा लोकांकडून फगवा स्वरूपात हक्क म्हणून पैसे मागतात. सध्या मेळघाटातील विविध भागांमध्ये अशा प्रकारचे नाके लागलेले आहेत, फगवा द्या नाहीतर रंग टाकतो असा दमही देण्यात येतो. त्यामुळे मुकाट्याने रहदारी करणारे लोकं फगवा देऊन मोकळे होतात. सध्या पाच दिवस मेळघाटात होळीची चांगलीच धूम राहणार आहे हे विशेष.

# विदर्भात उष्णतेची लाट

## तापमानाचा पारा चाळीशी पार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )** - उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तापमान 40 डीग्री सेल्सीअसवर गेल्याने नागरिक हैराण झाले आहे. घरोघरी एसी व कुलर सुरु झाले असून, अमरावतीकर थंडाव्याच्या शोधात असल्याचे दिसून येत आहे. आता आगामी काही दिवसात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. . होळीच्या दोन दिवस आधी अचानक उन्हाचा तडाखा वाढला. प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या दैनंदिन अहवालानुसार बुधवारप्रमाणे गुरुवारीही दिवसभर उष्मा जाणवत होता. 12 मार्च रोजी जिल्ह्याचे सरासरी कमाल तापमान 39.5 अंश इतके नोंदवले गेले. तर गुरुवारी हे तापमान 40 पार झाले. गुरुवारी 40.2 अंशांच्या पुढे पारा गेला. या दिवशी सरासरी किमान तापमान 21.1 अंश होते. शनिवारी तापमान कमाल तापमान 40.4 डीग्री सेल्सीअस होते, तर किमान तापमान 20.7 डीग्रीवर होते. येत्या आठवड्यापर्यंत अशीच स्थिती राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.राज्यात सर्वत्र कोरडे हवामान असल्यामुळे तसेच उत्तरेतून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यानुसार बुधवारी विदर्भातील तसेच मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पारा 40 अंशांच्या वर पोचले आहे. राज्यात सर्वाधिक तापमान अकोला येथे 41.3 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात तापमान 40 अंशांच्या वर पोचले आहे. कमाल सरासरी तापमानात तीन ते सहा अंशांची वाढ झाल्याने उन्हाच्या झळा तीव्र झाल्या आहेत. किमान तापमानातही सरासरीपेक्षा दोन ते चार अंशाने वाढ झाल्याने उकाडा वाढला आहे. त्यामुळे एसी, कुलर व फॅन लावावे लागत आहेत. परिणामी राज्यात विजेच्या मागणीतही वाढ झाली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या अंदाजानुसार चंद्रपूर व अकोल्यात गुरुवारी उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

| | |
|---|---|
| अकोला | 41.3 |
| अमरावती | 39.8 |
| बुलढाणा | 38.2 |
| वाशिम | 39.8 |
| यवतमाळ | 40 |

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# सकाळच्या सत्रातच भरणार सर्व शाळा

## वाढत्या तापमानामुळे दुपारच्या सत्रातील शाळा बंद | शिक्षण विभागाचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )**– वाढते तापमान लक्षात घेता जिल्ह्यातील सर्व शाळा 20 मार्चपासून सकाळच्या सत्रात भरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सकाळी 7.30 ते दुपारी 12.30 अशी शाळांची वेळ राहणार आहे. हा निर्णय खासगी व्यवस्थापन, जिल्हा परिषद, मनपा, नगरपालिका, शाळांना लागू असेल.

सध्या शहराचे तापमान 38 ते 39 अंश सेल्सिअस आहे. येत्या काळात पारा चाळिशी पार करेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने 2 लाख 56 हजार विद्यार्थी, त्याचे पालक साडे पाच हजाराहून अधिक शिक्षक, 864 शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे. बहुतेक शाळांमध्ये वर्षभर दररोज सकाळी 11 ते सांयकाळी 5 अशी सहा तासांची शाळा भरवली जाते. त्यामुळे मधल्या दोन सुट्यांचा कालावधी धरून सहा तासांचा अवधी होतो. तो कायम ठेवण्यासाठी सकाळी 7.30 ते दुपारी 12.30 ही वेळ निवडली आहे. ही वेळ निवडताना मधल्या सुट्यांची वेळही कमी केली. त्यामुळे आधीच्या जेवढ्या कालावधीचे अध्ययन आताही होणार आहे.



### स्थानिक स्वराज्य संस्थेसह सर्व शाळांना सूचना

संघटनासह पालकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी केली होती. उन्हाची दाहकता वाढत असल्यामुळे काही जिल्ह्यात 17 मार्चपासून सकाळच्या शाळा भरवणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर येथे बदल केला जाव, असे विद्यार्थी-पालकांसह शिक्षकांचे म्हणणे होते. या मागणीला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने होकार दिला असून 20 मार्चपासून सर्व शाळा दुपारच्या सत्रात न भरविता सकाळच्या सत्रात भरवणार आहेत. माध्यमिक विभागाच्या शिक्षण विभागाच्या सूत्रांनी दिली.

> सध्या उन्हाचा पारा चांगला तापत आहे. वाढत्या उन्हामुळे दुपारच्या सत्रात भरणाऱ्या शाळांची वेळ बदलण्याची मागणी शिक्षक व पालकांनी जिल्हा परिषदेकडे केली होती. यानुसार शिक्षण विभागाने आता दुपारी ऐवजी सकाळच्या सत्रात 20 मार्चपासून भरणार आहेत.
>
> **प्रिया देशमुख, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )**

# अप्पर वर्धा वसाहतीत वृक्षपूजन आणि वृक्षारोपनाने होळी साजरी

## पर्यावरणाच्या संरक्षणाचा दिला संदेश







**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी( दि.15 )** – पारंपारिकरित्या साजर्या होणार्या होळीला फाटा देत वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचा एक भाग म्हणून मोर्शीच्या अप्पर वर्धा वसाहतीत बंटी नागले यांच्या संकल्पनेतून रहिवाशांनी वेगळ्या पद्धतीने होळी साजरी केली. होळीचे दहन न करता पेवळ वृक्षपूजन आणि वृक्षारोपण करुन पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

होळी हा खरा तर आनंदाचा सण. होळीची पूजा म्हणजे दृष्टप्रवृत्तीचे दहन आणि सत्प्रवृत्तीचे पूजन असते. परंतु अलिकडे या होळीलाही वृक्षतोडीचा वेगळाच रंग लागला आहे. असंख्य झाडांची कत्तल करून होळी पेटविली जाते. मोठ्या प्रमाणात होळी पेटविल्या जातात. त्यासाठी झाडे तोडली जातात. यातून पर्यावरणाचा प्रश्नही निर्माण होत आहे. आज हे टाळण्याची गरज आहे. याच अनुषंगाने झाडांची होळी पेटविण्याऐवजी होळीच्या दिवशी वृक्षपूजन आणि वृक्षदत्तक घेण्याचा आगळा वेगळा उपक्रम अप्पर वर्धा वसाहतीतील नागरिकांनी राबविला. सोबतच शेणाच्या गोवर्यांना अग्नि देऊन त्याचे पूजन सुद्धा करण्यात आले.

अशा उपक्रमासाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. यामुळे पारंपरिकरीत्या होळी साजरी न करता पर्यावरणपुरक होळी साजरी करण्याचा संदेश वसाहतीतील नागरिकांनी दिला आहे.

यावेळी अशोक पांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या यशस्वितेकरिता धनंजय अमझरे, मुकेश खराले, साधना पाटील, कविता चवरे यांनी विशेष प्रयत्न केले. सामाजिक वणीकरणाच्या शीतल गुटे यांनी रोपे उपलब्ध करून दिलीत.

# विजया झाडे यांना छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न पुरस्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी ( दि.15 )**–नजीकच्या पार्डी देवी येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापिका विजया झाडे यांना कला-साधना सामाजिक संस्था व ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड, नवी मुंबईच्या वतीने कराडी समाज हॉल नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय महिला दिना निमीत्त आयोजित कार्यक्रमात राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले.



अभिनेत्री पद्मश्री नयना आपटे व महाराणी ताराराणी फेम अभिनेत्री साक्षी सुबोध नाईक तसेच संस्था अध्यक्ष मेघा महाजन व श्रीराम महाजन आणि रामजित जितु गुप्ता सहायक पोलीस निरीक्षक रत्ना खंडेलवाल, नगरसेविका सीमा गोवारी यांच्या उपस्थितीत मेडल, ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुस्तक देऊन त्यांना गौरविण्यात आले. विजया झाडे ह्या विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवीत असतात. तळागाळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे काम त्या सतत करत आहेत. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे मोलाचे योगदान त्या देत आहेत. त्या रक्तदान व गरजुंना साहित्य वाटप असे सामाजिक कार्य त्या करतात. वृक्षारोपन व पर्यावरण संरक्षणासाठी त्या झटत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## विणकारांनी नमुने सादर करावेत

**अमरावती**– सहकार, पणन व वस्त्रउद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत हातमाग विणकारांनी विणलेल्या उत्कृष्ठ हातमाग कापड नमुन्यांना प्रोत्साहन देऊन विनकरांना गौरविण्यासाठी हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यानुसार विभागीय हातमाग कापड स्पर्धा 2024-25 चे आयोजन विजयालक्ष्मी बिदरी (भा.प्रा.से) विभागीय आयुक्त नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दि. 20 मार्च 2025 रोजी दुपारी 5 वाजता प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रउद्योग, कार्यालय नवीन प्रशासकीय इमारत क्र. 2, 8 वा माळा सिविल लाईन्स, नागपूर 440001 नागपूर येथे करण्यात आले आहे.

# भारताने विश्वाला नैतिकतेची भक्कम बैठक दिली

## विवेक श्रीजी गाडगे महाराजांचे उद्गार | येरला येथे भागवत कथा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.15 )** – वेगवेगळ्या युगांमधून भारताचे संक्रमण झाले. त्यातून प्रेरणा, अनुभव घेऊन भारताने संपूर्ण विश्वाला धार्मिक, सामाजिक, तत्त्वज्ञान आणि नैतिकतेची भक्कम बैठक दिली आहे. मानवी संस्कृती वाईटावर चांगल्याचा विजय, अशुभावर शुभाची मात किंवा दानवांवर देवांचे वर्चस्व यांसारख्या मूल्यांनी भारलेली आहे. असे उद्गार हभप श्रीजी गाडगे महाराज यांनी काढले.



येरला येथील श्री महादेव देवस्थान येथे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. 10 ते 17 मार्च दरम्यान हभप श्री विवेक श्रीजी गाडगे महाराज भागवत कथा प्रवचन करीत आहेत. होळीच्या दिवशी समुद्रमंथन कथा सांगण्यात आली. त्यावेळी त्यांनी उपरोक्त वक्तव्य केले. त्यांनी सांगितले की भारतीय संस्कृती अगदी प्राचीन असून, तिला महान परंपरा आहे. समुद्रमंथनाच्या कथेनुसार मंदिरांचल पर्वताचा उपयोग मंथन काठी म्हणून आणि वासुकी नागाचा उपयोग दोरी म्हणून करण्यात आला. देवांना अमर होण्यासाठी अमृत हवे होते, तर दानवांनाही तेच हवं होतं. त्यामुळे देव आणि दानव यांनी मिळून समुद्र मंथन करण्याचा निर्णय घेतला. पण मंदिरांचलच्या खाली आधार नसल्याने, समुद्रात बुडायला लागला. ते पाहून भगवान विष्णूने महाकाय कासवाच्या रूपाने मंदार पर्वताला सागराच्या तळाशी आधार दिला. अशा प्रकारे समुद्र मंथन तयार झाले. असे गाडगे महाराज यांनी सांगितले. या भागवत कथेला येरलासह परिसरातील गावांतून भाविक भक्तांची मोठी गर्दी होत आहे.

# दर्यापूर शहरातील कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 )** – स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसह विशेषत: नगरपालिका निवडणुका येत्या काही दिवसातच होणार आहेत. अशातच दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्या नेतृत्वात शहरात काँग्रेसमध्ये अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांन प्रवेश (दि.15) घेतला आहे.

प्रहार चे पदाधिकारी जाकीर खा जाबाज खान यांच्यासोबत राजू जामनिक, गजानन भोकरे, दिगंबर पारडे, शंकर मदने, साहिल, विधाता पाचपोर, गजानन झाडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी दर्यापूर तालुका



अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष सय्यद रफिक, दर्यापूर शहर काँग्रेसचे अल्पसंख्यांक शहराध्यक्ष जम्मु पठाण, दर्यापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आतिश शिरभाते, अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे महासचिव ईश्वर बुंदिले, असलम मंसूरी, अजीम खा. तसेच महेश कुरळकर आदी उपस्थित होते.

# श्रीकृष्ण मंदिरात ब्रह्मविद्या शास्त्र निरूपण सोहळ्याचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 )** – माताखिडकी परिसरातील पुराण प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरात देवस्थान ट्रस्टचे वतीने ब्रह्मविद्या शास्त्र निरूपण सोहळ्याचे आयोजन 17 मार्च ते 23 मार्च पर्यंत होणार आहे. हा निरूपण सोहळा श्री चक्रधर स्वामींनी आपल्या श्रीमुखाद्वारे निरोपिलेल्या ब्रह्मविद्या शास्त्रावर होणार आहे.



या सोहळ्याअंतर्गत दररोज सायंकाळी 7 ते 9 या वेळेत ब्रह्मविद्या पाठशाळा महानुभाव आश्रम दरी, नाशिक चे संचालक प.पु.प.म. श्री. भाईदेवमुनी महानुभाव यांचे निरूपण होणार आहे. 17 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजता प्रवचन मालेचे उद्घाटन होईल. त्याचप्रमाणे 10 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता सांगता समारोह होईल.तरी सर्व भाविक भक्तांनी या धर्मरूप ज्ञान श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष पावडे, उपाध्यक्ष डॉ. अशोक राऊत, सचिव ॲड. अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष इंजि. एस.पी. देशमुख, विश्वस्त सुशांत चर्जन, अनिल सहानी, रावसाहेब राऊत यांनी केले आहे.

# अचलपूर विदर्भ मिल कॉलनीत महिलांनी साजरा केला रंगोउत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि. 15 )** – होळी हा भारतात साजरा केला जाणारा एक अत्यंत आनंददायी आणि उत्साहपूर्ण सण आहे. हा सण जीवनातील एक नवीन अध्याय, नवा उत्साह, आणि प्रेमाचा प्रतीक बनतो. होळीला विविध पद्धतीने साजरा केलं जातं. विशेषत: महाराष्ट्रात होळी साजरी करण्याची काही अनोखी परंपरा आहे. यामुळे अचलपूर येथील विदर्भ मिल कॉलीनीत महिलांनी रंग उधळीत हा उत्सव डीजेच्या तालावर नृत्य करीत रंग उत्सव साजरा केला यां उत्सवात कॉलोनीतील सर्व जाती धर्माच्या महिलांनी सहभाग घेत सामाजिक ऐक्य दाखविले. होलिका दहनाच्या दुसऱ्या दिवशी रंगाने, राखेने होळी साजरी केली जाते. महाराष्ट्रात हा दिवस अत्यंत धूमधामाने आणि उत्साहाने साजरा केला जातो. लोक एकमेकांवर रंग उधळून, पाणी रंगाने भरलेल्या बॅलून, गुलाल, आणि रंगीबेरंगी पाणी फेकतात. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींपर्यंत सर्वजण रंगांच्या खेळात सामील होतात. रंग उधळताना, डीजेवर गाणी, नृत्य, आणि खास रंग यांचं एक मिश्रण साजरं होतं. लोक नवा उत्साह, नवा जीवन, आणि निसर्गाच्या रंगांची उधळण व्यक्त करत आनंदात बुडून जातात. असेच अचलपूर येथील विदर्भ मिल कॉलोनीत मोठ्या हर्ष उत्साहात महिला एकमेकींना रंग लावत रंगउत्सव साजरा केला.यां उत्सवात कॉलोनीतील पुरुष, महिलेसह बच्चेपार्टी सहभागी झाली होती.



# अरविंद नळकांडे श्री गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी

## सचिवपदी शामसुंदर शिंगणे व कोषाध्यक्ष पदी प्रल्हाद काळे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 )** – दर्यापुर येथील श्री ग्रुह निर्माण संस्थेच्या (रजि.न. 259) निवडणूकीत अध्यक्षपदी शेतकरी नेते अरविंद नळकांडे यांची (दि.15) सर्वानुमते निवड करण्यात आली. 11 सदस्यीय या संस्थेचे मावळते अध्यक्ष मुरलीधर नाईक यांनी अध्यक्ष पदासाठी नळकांडे यांचे नाव सुचविले व उपस्थीत सर्व



कार्यकारीणी सदस्यांनी त्यास सहर्ष अनुमोदन दिले. याच प्रकारे संस्थेच्या सचिवपदी शामसुंदर शिंगणे व कोषाध्यक्ष पदी प्रल्हाद काळे यांची अविरोध निवड करण्यात आली. ही निवडणूक प्रक्रीया सहनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाचे अधिकारी विनोद वरकड यांचे देखरेखेखाली पार पडली. या सभेत निवड झालेल्या या तीन पदाधिका-यासह मुरलीधर नाईक, गिरीष भारसाकळे, राजाराम धन्धर, विलास टाले, सुन्नदा शेकार, संजय राउत, उषा ठाकरे, प्रमोद कुरळकर हे संचालक उपस्थित होते. उपस्थित सर्वांचे स्वागत व आभार मावळते सचिव सुनील मोरे यांनी मानले.

# विद्यापीठात 18 मार्चपासून भव्य लोकनाट्य महोत्सव

## महाराष्ट्र, तेलंगणा, छत्तीसगड, मध्यप्रदेशातील लोकनाट्याचे सादरीकरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 )** – भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 18 ते 20 मार्च, 2025 दरम्यान भव्य 'लोकनाट्य महोत्सव – 2025' चे विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी विकास विभागाच्या रंगमंचावर आयोजन करण्यात आले आहे.

18 मार्च रोजी सकाळी 10.30 वा. लोकनाट्य महोत्सवाचे उद्घाटन दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर येथील संचालक आस्था कार्लेकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूरचे सहायक संचालक दिपक कुलकर्णी, ज्येष्ठ रंगकर्मी एम.टी. नाना देशमुख, विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. विद्या शर्मा, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सत्रानंतर लगेच दुपारी 12




वाजता महाराष्ट्र राज्याच्या कोंकणातील दशावतार लोकनाट्याचे सादरीकरण, त्यानंतर प्रादर्शिक कला –नृत्य व नाट्य विभागाचे स्नेहसंमेलन-प्रथम नृत्य-नाट्य उत्सव, 19 मार्च रोजी सकाळी 11 वाजता कथक नृत्य, रानभूल एकांकिका, एका चोरीचे आर्थिक पृथ्थकरण एकांकिका व दुपारी 3 वाजता तेलंगणा राज्याचे चिंदु यक्षगान लोकनाट्याचे सादरीकरण, त्यानंतर छत्तीसगड राज्याचे नाचा लोकनाट्याचे सादरीकरण, सायंकाळी 7 वाजता अभिरुची कला व क्रीडा मंदिर, अमरावती निर्मित आणि डॉ. श्याम देशमुख दिग्दर्शित प्रसिध्द नाटककार विजय तेंडुलकर यांचे 'कमला' हे दोन अंकी ग्रे नाटक होईल. 20 मार्च रोजी मध्यप्रदेश राज्याचे स्वांग लोकनाट्याचे सादरीकरण, त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे पारंपारिक तमाशा लोकनाट्याचे सादरीकरण होईल.

# बडनेरात प्लास्टीक जप्तीचा धडाका

**चार प्रतिष्ठानांवर कारवाई, वीस हजाराचा दंड वसुली**

**बडनेरा मनपा व पोलीस प्रशासनाची संयुक्त कार्यवाही**

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा, ( दि. 15 )** – बडनेरा नवी वस्तीतील चांदणी चौक परिसरात असणार्या चार प्रतिष्ठाणांवर कारवाई करत प्लास्टिकचे ग्लास जप्त करण्यात आले. बडनेरा महापालिका प्रशासनाने पोलिस सरंक्षणात शनिवारी ही कारवाई केली असून, प्लास्टीकचा वापर करणार्या विक्रेत्यांकडुन वीस हजार रुपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. प्लास्टीक हे मानवी शरीराला अत्यंत हानीकारक आहे. प्लास्टीक मानवाबरोबर पशुसांठीसुध्दा धोकादायक ठरत आहे. कर्करोगासारखे मोठे आजार प्लास्टीक वापरामुळे होत असल्यामुळे शासनाने 50 मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीकवर बंदी घातलेली आहे. परंतू प्लास्टीक बंदी असतानादेखील अमरावती व बडनेरा शहरातील अनेक व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये प्लास्टीकचे ग्लास व पन्नीचा वापर होत आहे. ही बाब लक्षात घेता अश्यातच अमरावती महानगरपालिकेने प्लास्टीक जप्तीची मोहिम हाती घेतली आहे. प्लास्टिक वापर टाळण्यासाठी विशेष मोहीम राबविलि जात असून, याच अंतर्गत बडनेरा शहरांमध्ये पोलीस प्रशासन व मनपा यांच्या संयुक्तरीत्या मोहीम राबविण्यात आली. मनपाच्या पथकाने होळीच्या पर्वावर शहरातील दुकानांची पडताळणी केली असता त्यामध्ये आढळणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तुंचा वापर अथवा विक्री करणाऱ्या प्रतिष्ठानावर कार्यवाही करण्यात आली. मनपाच्या पथकाने बडनेरातील अनेक दुकानांची पाहणी केली. दरम्यान चांदणी चौक परिसरातील तीन ते चार दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्लास्टिकचे ग्लास विक्री होत असल्याचे आढळून आले. मनपा प्लास्टिक बंदी निर्मूलन विभागाकडून शारदा गुल्हाने, तर बडनेरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांनी आपल्या ताफ्यासह सदर कार्यवाही केली.



### प्लास्टीक वापरणाऱ्यांचे धाबे दणाणले

पोलीस व मनपाच्या या कार्यवाहीमुळे अनेक दुकानदारांची ताराबंळ उडाली होती. प्लास्टिक वापरणार्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर कार्यवाही बघता अनेक प्रतिष्ठांनानी वेळेवर आपल्या दुकानातील प्लास्टिकट्आ वस्तु त्वरीत हटविल्या. या कारवाईसाठी जागोजागी संवेदशील भागात तगडा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# खत चोरी प्रकरणातील चोरटे अटक

**5 लाख 68 हजाराचा मुद्देमाल जप्त | दत्तापुर पोलीसांची कारवाई**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.15)** – खत चोरी प्रकरणात दत्तापूर पोलिसांनी दोन आरोपींना 15 मार्च रोजी अटक केली. मोरेश्वर लक्ष्मणराव भलावी (41) व आशिष गजानन बनकर (28, दोन्ही रा. शिवाजी वार्ड, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या ताब्यातून 5 लाख 68 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

14 मार्च रोजी दत्तापुर पोलिस ठाण्यात मयुर विजय गहनेवार (रा. पतंग मार्केट चौक, दत्तापुर) यांनी फिर्याद दिली की, 13 मार्च रोजी रात्री दरम्यान मालधक्क्यामध्ये आलेला खताचा माल ट्रकमध्ये भरण्यात आला आणि जुना धामणगाव येथील बालाजी मंगल कार्यालयाचे मागे असलेल्या गोडाउनचे समोर ट्रक उभा करून ठेवला होता. सदर ट्रकमधुन कोरोमंडळ कंपनीच्या 50 नग खताच्या बॅगा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेल्या. या तक्रारीवरून दत्तापुर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना दत्तापूर पोलिसांना माहिती मिळाली की, आरोपी हे गावातीलच आहे. या माहीतीवरून पोलिसांनी आरोपी मोरेश्वर लक्ष्मणराव भलावी व आशिष गजानन बनकर यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, दोन्ही आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

## परसोडी शेतशिवारात लपून ठेवला होता माल

सदर गुन्ह्यात चोरी केलेला माल आरोपींनी परसोडी येथील शेतशिवारात लपवून ठेवला होता. या माहितीवरून पोलिसांनी चोरीस गेलेला मुद्येमाल 50 नग खताच्या बॅगा (किंमत अंदाजे 68000 रुपये), गुन्ह्यात वापरलेले वाहन (किंमत अंदाजे 5 लाख) असा एकूण 5 लाख 68 हजाराचा माल जप्त केला. पुढील तपास दत्तापूर पोलीस करीत आहेत. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, चांदुररेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या नेतृत्वात अंमलदार सागर कदम, नवनाथ खेडकर, अरूण पवार, पवन महाजन यांनी केली आहे.

# स्मार्ट प्रीपेड रिचार्ज मीटरला नांदगाववासीयांचा तीव्र विरोध

## महावितरणला माकपतर्फे निवेदन

## ग्राहकांनीही अर्जाद्वारे आक्षेप नोंदविला



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, (दि.15)** – महावितरणातर्फे बसविण्यात येत असलेल्या स्मार्ट प्रीपेड रिचार्ज मीटरला नांदगाव खंडेश्वर तालुक्यात तीव्र विरोध होत आहे. त्यासाठी स्मार्ट मीटर विरोधी कृती समिती स्थापन करण्यात आले असून या समितीचा भाग असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, अखिल भारतीय किसान सभा, सिटू, शेतमजूर युनियन या पक्ष संघटनांच्यावतीने महावितरणच्या नांदगाव खंडेश्वर येथील कार्यकारी अभियंत्यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे.

अनेक ग्राहकांनी अर्ज सादर करुन स्माट मीटरवर आक्षेप घेतला आहे, त्याची दखल घेवून स्मार्ट मीटर लावणे तात्काळ बंद करण्यात यावे, अशी मागणी यावेळी निवेदनातून करण्यात आली. स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याचे धोरण महावितरणने अवलंबिले आहे. ते तात्काळ थांबवून इलेक्ट्रिक स्मार्ट प्रीपेड मीटर ज्या वीज ग्राहकाकडे लावले आहे, ते त्वरित काढून जुने वीज मीटर लावण्याची मागणी यावेळी करण्यात आली. वीज ही मूलभूत गरज आहे.

त्यामध्ये होणार्या बदलाचा परिणाम थेट दैनंदिन जीवनावर होतो. 85 टक्के ग्राहक शेतकरी, शेतमजूर, कुशल, अकुशल कामगार, असंघटित कामगार, जेमतेम जीवन जगणारे आहेत. म्हणून याबाबतीत वीज ग्राहकांना खाजगी कंपन्यांच्या दावनीला बांधणे त्याला नफ्याचे क्षेत्र बनवले आहे. सरकारने आपली जबाबदारी नाकारणे हे समग्र प्रजासत्ताक संकल्पनेच्या विरोधात आहे. कोणते मीटर लावावे हा अधिकार वीज कायदा 2003 कलम (5) प्रमाणे वीज ग्राहक यांचा आहे. असा इशारा या निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी माकप तालुका सचिव शाम शिंदे, अनिल मारोटकर, दिनेश बावणे, जयेंद्र सुनील, शत्रुघ्न मगर, ज्ञानेश्वर पाटमासे, संजय डोके, नारायण सोनोने, लक्ष्मण झिमटे, नामदेव सोनोने, साहेबराव कराळे, किशोर शिंदे या सह वीज ग्राहक उपस्थित होते.

# बारवर दगडफेक करून संचालकावर हल्ला

## श्याम चौकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्याम चौकात असलेल्या कृष्णा बारमध्ये दोन तरुणांनी पाण्याची बाटली न दिल्याने संचालकावर दगडफेक करून त्यांना मारहाण केली. ही घटना 14 मार्च रोजी उघडकीस आली आहे. सुमित सुरेशकुमार तरडेजा (35, रा. दस्तूरनगर) यांच्या फिर्यादीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी पियुष धोटे व गोलू धोटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दस्तूर नगरमध्ये राहणारे सुमित तरडेजा यांचे श्याम चौकात कृष्णा बार आहे. 14 मार्च रोजी दुपारी 12.30 वाजता बार बंद करून घरी गेले. त्यानंतर वेटर गोपाल याने 2.30 वाजता फोन करून दोन तरुण हॉटेलच्या बारमध्ये आल्याचे सुमित यांना सांगितले. त्यांनी पाण्याची बाटली मागितली व पाण्याच्या बाटल्या न दिल्याने त्यांनी बारवर दगडफेक केली, असे सुमितला सांगितले. त्यानंतर सुमित यांनी बारमध्ये जाऊन सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्यांना दोन तरुण दगडफेक करताना दिसले. त्यानंतर ते हॉटेलमधून बाहेर आले, तेव्हा दोन्ही तरुण नमुना गल्ली क्रमांक 2 मध्ये उपस्थित होते. त्यावेळी सुमितने त्यांच्याजवळ जाऊन दगडफेक का केली, अशी विचारणा केली असता, आरोपींनी त्यांना येथे धंदा करायचा असेल तर पैसे व खोली द्यावी लागेल, या भागात राहायचे असेल तर आम्हाला चालवा लागेल, असे म्हणत मारहाण करण्यास सुरुवात केली. ज्यात सुमितचे दोन दात तुटले. यानंतरही आरोपींनी सुमितला मारहाण केली. वेटर आणि सुमितचा मोबाईल घेऊन पळून गेला. घटनेनंतर सुमितने कोतवाली पोलिसात या प्रकरणाची तक्रार केली. पोलिसांनी आरोपी पियुष धोटे आणि गोलू धोटे यांच्यावर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# शासकीय खरेदीचे मुदत वाढवून शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करा!

**कृउबा समिती सभापतींचे निवेदन**

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड (दि.15)**– शासनाने शासकीय कापूस खरेदी ला मुदतवाढ देऊन शेतकऱ्यांकडे असलेला सर्व कापूस शासकीय कापूस खरेदी करावा अशी मागणी कॉटन कॉर्पोरेशनच्या महाप्रबंधकांना केली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी तालुक्यात शासकीय कापूस खरेदी सीसीआय मार्फत चालू आहे. शासकीय कापूस खरेदी करीता शेतकऱ्यांना नोदणी करण्याकरीता 15 मार्च 2025 ही शेवटची तारीख देण्यात आली होती. परंतु सीसीआय मार्फत नोंदणी करीता वापरण्यात येणारे सॉफ्टवेअर व्यवस्थित काम करित नसून शेतकऱ्यांचे कापूस विक्री करीता लागणारी नोंदणी झालेली नाही. सतत सॉफ्टवेअरमध्ये अडचण निर्माण झाल्याने बरेच शेतकरी सीसीआय चे केंद्रावर चकरा मारून थकले आहे, परंतु सॉफ्टवेअर चालत नसल्याने दिवसातून फक्त दोन ते तीन शेतकऱ्याची नोंदणी झाली. सध्या शेतकऱ्यांचे घरात मोठ्या प्रमाणात कापूस असून शासकीय खरेदीची 15 मार्च 2025 ही शेवटची तारीख असल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला खाजगी मार्केट मध्ये भाव नसून शेतकऱ्यानं शासकीय खरेदीची आशा आहे. तरी शासनाने शासकीय कापूस खरेदी ला मुदतवाढ देऊन शेतकऱ्यांकडे असलेला सर्व कापूस शासकीय कापूस खरेदी करावा अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी शासनाला व कॉटन कॉर्पोरेशन चे महाप्रबंधक यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांचा पूर्ण कापूस विक्री होई पर्यंत मुदत वाढ द्यावी अशी मागणी केली. वरूड तालुक्यात शेतकऱ्यांचा फक्त 90 हजार क्विंटल कापूस खरेदी झाला असून या पेक्षा जास्त कापूस शेतकरी यांचे घरात पडून आहे. शेतकऱ्यांची सध्या असलेले हाल लक्षात घेतला शेतकऱ्यांचे पाठीशी शासनाने खंबीर पण उभे राहून शेतकऱ्यांचा संपूर्ण कापूस खरेदी होणे करीता मुदतवाढ देऊन शेतकऱ्यानं न्याय द्यावा अशी मागणी सर्व शेतकऱ्यांकडून होत आहे.



## तक्रार मागे न घेतल्याने चाकूने हल्ला

**अमरावती** – पोलिस तक्रार परत न घेतल्याने 24 वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला केल्याची घटना 14 मार्च रोजी दुपारी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केचे हॉस्पिटलसमोर घडली. जखमी अंकुश संजय राऊत (24, रा. महात्मा फुले नगर, नवसारी, अमरावती) यांच्या फिर्यादीवरून गाडगेनगर पोलिसांनी गोलू माथुरकर, मन्या माथुरकर व अन्य एकावर गुन्हा दाखल केला आहे. 14 मार्च रोजी दुपारी अंकुश राऊत हा मित्राच्या आजीचा अत्यसंस्कार कार्यक्रम आटोपून घरी जात होता. दरम्यान आरोपी गोलू, मन्या आणि त्याच्या मित्राने अंकुशला केचे हॉस्पिटलसमोर अडवले. त्यानंतर पोलिस तक्रार परत न घेतल्याच्या कारणावरून आरोपीने चाकू काढून अंकुशच्या पाठीवर तीन वार केले. त्यामुळे अंकुश राऊत जखमी झाले. या घटनेची माहिती कुटुंबीयांना मिळताच ते घटनास्थळी पोहोचले. दरम्यान आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते.

# जैतादेही शाळेतील विद्यार्थ्यांची पर्यावरणपूरक होळी

## पर्यावरणाच्या रक्षणावर नेहमीच असतो भर







**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.15)**– मेळघाटातील जैतादेही येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची नेहमीच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारी शाळा म्हणून ओळख झाली आहे. पर्यावरणाच्या रक्षणाचा संदेश देत शाळेत वेगवेगळे उपक्रम सातत्याने राबविले जातात. होळीही त्याला अपवाद नाही. शाळेतील विद्यार्थ्यांनी पूर्णतः नैसर्गिक व सुक्या रंगांचा वापर करुन उत्साहात यावर्षीही होळी साजरी केली.


या विद्यार्थ्यांनी शाळेत पर्यावरणपूरक होळी कशी साजरी करता येईल? नैसर्गिक रंग वापरल्यामुळे काय काय फायदे होतात? रासायनिक रंगामुळे होणारे निसर्ग व मानवाला होणार्याम दुष्परिणामाविषयी शाळेतील मुख्याध्यापक गणेश जामुनकर व सहाय्यक शिक्षक जितेंद्र राठी यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. रासायनिक रंगामुळे त्वचेला होणारा दुष्परिणाम, पाण्याची नासाडी, पाण्यासोबत रासायनिक रंग पाण्याच्या स्रोतात कसे मिसळले जातात? याविषयी विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

हे सर्व टाळायचे असेल तर आपण नैसर्गिक रंग वापरायला हवे. त्याचा आपल्या शरीराला कसा फायदा होईल? सुके रंग वापरले तर पाण्याची कशी बचत होऊ शकते? आपले खर्च होणारे पैसे कसे वाचू शकतो? यावर सविस्तर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

नैसर्गिक रंग तयार करण्यासाठी कोणकोणते पदार्थ वापरू शकतो यावर मार्गदर्शन करण्यात आले. यात पळस फुले, झेंडू फुले, हळद, बिट, पुदिना, बेसन यासारखे पदार्थ वापरून विविध रंग कसे तयार करायचे यावर माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांनी असे नैसर्गिक रंग वापरण्याची तयारी दर्शविली. रासायनिक रंग न वापरण्याची प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांनी घेतली. शाळेतील सावन प्रेमालाल बेलसरे, सुनाक्षी सतीश बेलसरे, स्वाती चंपालाल कास्देकर, परिधी प्रभुलाल पोरवाल, विशाखा उमेश कास्देकर, विष्णू चंपालाल कास्देकर, प्रज्ञा कैलाश अजनेरीया या विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंग तयार केले. श्रावणी धांडेकर, जिगर धिकार, साजन धांडेकर, विपुल धिकार, प्रतीक्षा धिकार, वैष्णवी तांडीलकर हे विद्यार्थी रंग तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर धुलीवंदनात या विद्यार्थ्यांनी पूर्णतः नैसर्गिक रंगांचाच वापर केला आणि गावातील अन्य लोकांनाही हेच रंग वापरण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# नोकरीच्या नावावर युवतीची ऑनलाईन फसवणूक

## 90 हजार रुपये लुबाडले




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.15)**– नोकरी मिळून देण्याची बतावणी करून वरुड तालुक्यातील जरूड या गावातील रहिवासी असलेल्या एका युवतीकडून 90 हजार रुपये ऑनलाईन लुबडल्यावर तिला आणखीन 33 हजार रुपयांची मागणी करून तिची फसवणूक करण्यात आली. ही युवती रायगड जिल्ह्यातील महाड येथील गोदरेज ग्रोव्हेट या कंपनीत नोकरीला आहे. प्रतीक्षा जगदीश अलोने असे तिचे नाव असून अभिषेक नाव सांगत एका व्यक्तीने तिला फोन केला व हायरवेल या कंपनीत नोकरी लावून देण्याचे सांगितले होते.

महिनाभरापूर्वीच प्रतिक्षा सुट्टी काढून गावात आली. जरूड येथे असताना 6 मार्च 2025 रोजी तिच्या मोबाईलवर फोन आला. संपर्क करणाऱ्याने स्वतःचे नाव अभिषेक असे सांगितले. हायर वेल कंपनीतून बोलतो कंपनी जॉब कन्सल्टन्सी मध्ये काम करीत असल्याचे तो म्हणाला. प्रतीक्षाने स्वतःचे शैक्षणिक दस्ताऐवज अभिषेक नामक व्यक्तीने दिलेल्या ई-मेलवर पाठविले. प्रारंभी नोंदणी शुल्क म्हणून दीड हजार रुपये संशयित अभिषेक याने दिलेल्या क्रमांकावर पाठविले. त्यानंतर संबंधित युवतीला विविध प्रकारच्या लिंक पाठविण्यात आल्या. युवतीला विविध कारणे सांगून पैशाची मागणी केली गेली.

प्रतीक्षाने 90 हजार 624 रुपये एवढी रक्कम भरल्यानंतरही, पुन्हा तिला फोन करून 33 हजार रुपयांची मागणी करण्यात आली. तिने नोकरीबाबत विचारणा केली असता संशयिताने उत्तर देण्यास टाळले. अभिषेक नामक संशयित व्यक्तीने आपली 90 हजार रुपयांनी ऑनलाईन फसवणूक केली, असा आरोप पीडित मुलीने वरुड ठाण्यात नोंदविलेल्या तक्रारीतून केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित अभिषेक विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू करण्यात आला आहे.

# मेळघाटात होळीचा उत्साह, नवचैतन्याची उधळण

**आदिवासी संस्कृतीचे अनोखे दर्शन | पारंपारित नृत्य, वादन, गायनाची धूम**



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.15)** – मेळघाटातील होळी ही आदिवासी संस्कृतीचे अनोखे दर्शन घडविणारा उत्सव असतो. सध्या मेळघाटात होळीचा उत्साह दिसून येत आहे. सर्वत्र नवचैतन्याची उधळन होत आहे. पारंपारिक नृत्य, गायन, वादन याद्वारे होळीचा आनंद साजरा करण्यात मेळघाटातील आदिवासी सध्या तल्लीन आहेत. होळीच्या निमित्ताने वेगवेगळ्या प्रथा आदिवासी बांधव पाळतात. पाच दिवस अनेक कार्यक्रम व उपक्रमांद्वारे मेळघाटवासीय आपल्या संस्कृतीचे जतन करताना दिसत आहेत.

मेळघाटातील आदिवासी बांधवांची संस्कृती ही प्राचीन आहे. शेकडो वर्षांचा इतिहास तिला आहे. काळानुसार बदल होतो मात्र मेळघाटातील आदिवासी बांधव आपली संस्कृती आजही टिकवून आहेत. होळीच्या सनातून त्याची प्रचिती मिळते. मेळघाटच्या आदिवासींमध्ये होळी उत्सवाला अन्यसाधारण महत्व आहे. मेळघाटात पाच दिवस होहीचा उत्साह असतो. दोन दिवस नियोजनपूर्वक प्रत्येक गावात होळी पेटविला जाते. लहान मुले, घरातील स्त्रिया व पुरुष नवीन कपडे परिधान करतात. महिला दाग दागिन्यांचा साज करुन होळीत सहभागी होतात. होळीमध्ये महिलांसाठी नवीन दागिने बनविण्याची प्रथा आहे. सोनाराकडे गहाण असलेले दागिने सोडविण्यासाठी आदिवासी होळीचा मूहूर्त साधतात.

सायंकाळी होळी पेटवली जाते. होळी पेटल्यानंतर होळीभोवती महिला-पुरुष, युवक-युवती नृत्य करतात. त्यानंतर सर्व मंडळी गावामध्ये येतात. रात्रभर आदिवासी पारंपारिक गीतांवर नृत्य संगित चालते. सतत पाच दिवस मेळघाटात रंगपंचमी खेळल्या जाते. या पाचही दिवसांमध्ये गावामध्ये उत्सव चालू असतो. विविध आदिवासी बोली भाषेतील गीते गायली जातात. ढोलकी, बासरी सुद्धा वाजवली जाते.

आदिवासी बांधव त्याच्या तालावर नाच करतात. डोक्याला मोरपीस खोवले जातात. धोतर, पांढरा शुभ्र सदरा व डोक्याला पगडी, गळ्यात रुमाल असा अस्सल आदिवासी पेहराव आदिवासी याप्रसंगात करतात.

## मेघनाथ यात्र ठरली आकर्षण

होळी उत्सवादरम्यान मेळघाटातील मोठ-मोठ्या गावांमध्ये मेघनाथ यात्रा भरविल्या जाते. आदिवासी बांधवांची मेघनाथ बाबावर मोठी श्रद्धा आहे. आदिवासी बांधव दरवर्षी नवस करतात व नवस फेडला जातो. 100 ते 150 फूट उंच खांब असतो नवस फेडण्यासाठी नवस फेडणार्यारला खांबावर लटकवीले जाते. तीन फेरे मारले जातात. यासह या ठिकाणी पूजा अर्चना केली जाते. कोंबडे व बकर्यांरचा नवस फेडला जातो. या यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या यात्रा काटकुंभ, हतरु, डोमा, काजलडोह, कारा, जरीदा इत्यादी ठिकाणी भरतात. यात्रेत मोठी बाजारपेठ भरते.

### यात्रेत जुळतात लग्न

मेघनाथ यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे या यात्रेमध्ये युवक-युवती एकमेकांना पसंत करतात. यात्रेतच त्यांचे विवाहही जुळतात. पान विक्रेत्याच्या दुकानात ही प्रक्रिया पार पडते. यात्रेत पानाची विक्री जोरात होते. आदिवासी युवक-युवती या ठिकाणी पान खरेदी करून एकमेकांना पानाचा विडा देऊन पसंती देतात व नंतर लग्न करतात. होळीच्या सणात या प्रथेला विशेष महत्व आहे.

## जाहीर सुचना

माझे अशील श्री अनुप पुरुषोत्तम तरडेजा यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदी खेत दि. ०६/११/२०१७ र.द.क्र. ३३४० हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरिल दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतचे वर्णन**

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती बाहेर व दु.नि. अमरावती (ग्रा.) यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र. ४४१/१A/१B,२,३,४, प्लॉट क्र. १/(२+३) दुकान क्र. K६-२०३ (६८५.८८ चौ.फूट) मौजे नांदगांव पेठ-२ प्रगणे नांदगांव पेठ ता. अमरावती जि. अमरावती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पुर्वे | :- दुकान क्र. K-६- २२४ |
| पश्चिमेस | :- कॉम्प्लेक्स रोड |
| उत्तरेस | :- दुकान क्र. K-६-२०२ |
| दक्षिणेस | :- दुकान क्र. K-६-२०४ |

शिक्का

**पत्ता :- ॲड. वैभव न. काकिर्डे ॲन्ड,**
**१९, हरिओम कॉलनी संताजी नग, अमरावती**
**मो. ९०७३८२१००१**

# भक्तिमार्ग

## अवघा रंग एक झाला

**रंगविरहीत जगण्याची कल्पनाच असह्य होते. अध्यात्म आणि प्रपंचाची सांगड घालणाऱ्या, जीवनेच्छा फुलवणाऱ्या, विचारांवर प्रभाव टाकणाऱ्या आणि निसर्गाशी तादात्म्य पावण्यास साह्यभूत ठरणाऱ्या रंगांचा उत्सव म्हणजे रंगपंचमी. येऊ घातलेल्या उन्हाळ्याची सन्नता हा शारीरिक पातळीवरील, उन्माद आणि जल्लोश हा भावनिक पातळीवरील तर विधात्याच्या रंगाशी एकरुपता हा अध्यात्मिक पातळीवरील संदर्भ यातून निघू शकतो.**

भक्ती विशेष

सणांकडे बघण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते. कोणाला सणांच्या साजरीकरणात स्वारस्य असतं, कोणी सणांचे संदर्भ आणि त्यातील रुपकं शोधून आपली अभ्यासाची भूक भागवतात, कोणी या निमित्ताने संस्कृतीशी नाळ जोडून ठेवू पाहतात, कोणी सणांद्वारे देण्यात येणारा निसर्गरक्षणाचा हेतू आचरणात आणून सामाजिक भान जपतात तर कोणी त्रयस्थपणे सणांचे उपचार पार पाडून अलिप्तता जपतात. प्रत्येकाची विचारांची पद्धत निराळी आणि साजरीकरणाचे मार्ग निराळे... पण या सर्वांच्या मुळाशी बघू जाता सगळ्या सणांमागे दडलेला परमात्म्याशी एकरूप होण्याचा संदेश लपून रहात नाही. उत्सवी साजरीकरण असो की गांभीर्य राखून केली जाणारी पूजा-आराधना, दोन्ही वेळी विधात्याच्या विविध अवतारांप्रती, रूपांप्रती एकरूप होण्याचा, त्याच्या रंगात रंगून जाण्याचा, त्याच्या ठायी रममाण होण्याचा व्यक्त अथवा अव्यक्त संदेश जाणवत राहतो. रंगपंचमीदेखील त्याला अपवाद नाही.

रंगांबरोबर एकरूप होण्याचा उत्सव म्हणजे रंगपंचमी. होळीनंतर पाचव्या दिवशी आबालवृद्ध या उत्सवाच्या रंगात रंगून जातात. हा उत्सव म्हणजे जीवनातल्या विविध घडामोडींचा, भावभावनांचा कडू-गोड स्मृतींचा उत्सव असतो. या सणाचा अर्थ रंगांपुरता मर्यादित राहत नाही तर भावनांच्या कल्लोळातून तो अंतरंगात मिसळून जातो. उत्तर भारतात 'होरी'वरून अनेक संतकवींनी केलेल्या काव्यरचना पाहता रंगपंचमी किती महत्त्वाची आणि सांस्कृतिकदृष्ट्या अनन्यसाधारण आहे हे लक्षात येतं. गोकुळातल्या गोप-गोपिका आणि कृष्णाचे सवंगडी यांनी या उत्सवात केलेली धमाल आणि त्याला शेवटी आलेला अध्यात्म्याचा आणि आत्मोन्नतीचा स्पर्श उत्सवाचं महत्त्व स्पष्ट करून जातो. मुळात श्रीकृष्णाचा सावळा रंग अनेक साहित्यिकांना मोहात पाडणारा! सावळा रंग हा ना निळा आहे ना काळा. त्यामध्ये या दोन्ही छटांमधली एक गहन गंभीरता दडली आहे. त्याच्या या वर्णाबरोबर त्यांनी वापरलेल्या रानातील फुलांच्या वेगवेगळ्या रंगांच्या माळा आणि त्यावर कळस म्हणजे डोक्यावरील मुकुटात अडकवलेलं मोराचं पिस म्हणजे सर्व रंगांना एकत्र करून त्याचा गंधित संदेश देणारा युगपुरुष आपल्या डोळ्यापुढे येतो. अशा रंगांच्या विविध छटा आयुष्यात सदैव बाळगणाऱ्या श्रीकृष्णाने होळीला अर्थात रंगपंचमीला खेळापुढे जाऊन तत्त्वज्ञानाची डूब दिली नसती तरच नवल होतं.



कृष्णाच्या काळातील ही रंगपंचमी कशी बरं असेल? कृष्ण रंग टाकल्याविना कुणालाच सोडत नाहीये. राधेला तरी तो कसा सोडेल? पण राधेलाही मनातून श्रीरंगाच्या रंगात भिजून जायचं आहेच! वर वर कितीही प्रतिकार केला तरी तो लटका आहे हे कृष्णही जाणून आहे. हा रंग काही केवळ होळीचा नाही तर तो अजरामर प्रेमरंग आहे. राधा-कृष्ण ही तर प्रेमरंगात न्हाऊन निघालेली जोडी. 'अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग' अशा वर्णनातला रंग त्या श्रीरंगाला अतिशय प्रिय. मग त्याची प्रजा तरी त्यापासून दूर कशी राहील? श्रीकृष्णाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या द्वारका, वृंदावन, गोकुळ, नंदगाव येथे आजही रंगपंचमी एक नाही तर बरेच दिवस खेळली जाते.

श्रीकृष्ण लहानाचा मोठा झाला ते नंदगाव आणि राधेचं बालपण गेलं ते बरसाना ... या दोन्ही गावांमध्ये भरपूर रंग खेळला जातो. गुलाबी आणि पांढऱ्या रंगात दोन्ही गावं न्हाऊन निघतात. 'केसुडो' हा नारिंगी-लालसर नैसर्गिक रंग भरपूर प्रमाणात वापरला जातो. हे दृश्य मोठं विहंगम असतं. ते बघण्यासाठी देशी विदेशी पर्यटकही पोहोचतात. गावाबाहेरच्या मोकळ्या मैदानात खास उत्सवाचं नियोजन केलं जातं. होळी-रंगपंचमीनिमित्त वृंदावन इथल्या मंदिरात खास उत्सव आयोजित केला जातो. पंधराव्या शतकातील संत हरिदास यांचं 'बाकी-बिहारी' मंदिर उत्सवाचं प्रमुख केंद्र असतं. तिथे पांढरी आणि गुलाबी वेशभूषा केलेले हजारो यात्रेकरू वृंदावनच्या राजाबरोबर होळी खेळतात आणि उत्साहात न्हाऊन निघतात.

मथुरा जिल्ह्यातल्या गोवर्धन पर्वताजवळ असलेल्या सुंदर जलाशयाचं नावच मुळी गुलाल-कुंड आहे. हा संपूर्ण परिसर होळी-रंगपंचमीच्या निमित्ताने केशरवाणी आणि कसुदा फुलांच्या भगव्या-लाल रंगात रंगून गेलेला असतो. हवा तशीच सुखद गार असते. पूर्ण चंद्र उगवलेला असतो आणि प्रियजनांबरोबर रंग खेळण्याचा अनोखा आनंद आजही प्रेमीजन अनुभवत असतात. कारण राधा-कृष्णाची रासक्रीडा जितकी अविस्मरणीय आहे तेवढंच त्यांचं अवखळ प्रेम चिरंतन आहे, अनंत आहे. अजूनही श्रीरंग तसाच रंगात रंगून जातोय. राधाही तशीच बेहोष होतेय. म्हणूनच या भागातली रंगपंचमी भलतीच रंगभरी आणि रसभरी ठरते. तिचा जल्लोष संपूर्ण राज्यालाच नव्हे तर देशालाही ऐकायला मिळतो. होळीची परंपरा जपून कृष्णकाळातल्या आठवणी इथे ताज्या केल्या जातातच पण विज्ञानयुगातही अध्यात्म आणि पुराणाची गोडी जपली जाते. साक्षात श्रीकृष्णाचं आणि राधेचं गाव म्हटल्यावर अशा प्रकारची धामधूम अपेक्षितच असते. आजच्या काळात ती पहिल्याच उत्साहात साजरी केली जाते आणि त्याला वेगवेगळ्या प्रांतातले पर्यटक आवर्जून उपस्थिती लावतात हे महत्त्वाचं. अखेरीस रंग हे मानवी जीवनाचं वैशिष्ट्य आहे. विविध रंगात, त्यांच्या छटांमध्ये रंगून जाणं ही प्रत्येकाची आवड आहे. या आवडीला केवळ उत्सवी स्वरूप न देता त्यातून जीवनाचा अर्थ सांगणारा श्रीकृष्ण त्या अर्थात रंगून जाणाऱ्या त्याच्या गोपिका आजही आपल्याला त्यांच्या भक्तीरसाच्या वर्णनाने रंगवून ठेवतात.

## क्षमाशीलता हवी



धर्म देशोदेशीचे

प्रत्येकाने क्षमाशील असणं गरजेचं आहे. क्षमा म्हणजे इतरांची चूक माफ करणं. स्वत:च्या इच्छेने ही चूक समाप्त करणं म्हणजे क्षमा. जगभरातल्या प्रत्येक धर्मात क्षमाशील असण्यावर भर दिला गेला आहे. समोरच्यावर राग न धरता क्षमा करून मोकळं होण्याबाबत सांगण्यात आलंय. जैन धर्म आपल्याला अहिंसेची शिकवण देतो. या धर्मात क्षमाशीलतेला खूप महत्त्व आहे. या धर्मात क्षमावाणी पर्वाचं आयोजन केलं जातं.

क्षमावाणी पर्व हा क्षमेचा उत्सव आहे. या पर्वाला दशलक्षण महापर्व असंही म्हटलं जातं. जैन धर्माचे अनुयायी हे दशलक्ष महापर्व साजरं करतात. दहा दिवस जैन धर्मातल्या दहा सिद्धांतासाठी दिले जातात. या सिद्धांतांना अंगिकारलं जातं. त्यानंतर दहाव्या दिवशी क्षमावाणी पर्व साजरं केलं जातं. जैन धर्मातले मुनी याबाबत सांगतात की आपल्या मनात क्रोध उत्पन्न न होणं महत्त्वाचं आहे. क्रोध निर्माण झाला तरी त्याला दूर केलं गेलं पाहिजे. आपल्या प्रत्येकाकडून चुका होत असतात. स्वत:सोबत इतरांच्या चुकाही आपण माफ केल्या पाहिजे. स्वत:सोबतच इतरांच्या प्रतीही क्षमाशील भाव ठेवला पाहिजे. याची जाणीव क्षमापर्वाच्या माध्यमातून रूजवली जाते. क्षमा मागितल्याने आपण लहान होत नाही तर आपला अहंभाव कमी होतो. महाभारत आणि गीतेतही क्षमेबाबतचे उल्लेख आहेत. आपण समर्थ असूनही मनात क्षमाभाव असणं हे साधू असण्याचं लक्षण आहे असं गीतेत नमूद करण्यात आलं आहे. क्षमा करून जुन्या गोष्टींना विसरणाऱ्या माणसाला अल्लाकडून भेट मिळते, असा उल्लेख कुराणमध्येही आढळतो. त्यामुळे समोरच्या व्यक्तीला क्षमा करून आपण क्षमाशीलतेचा भाव जपू शकतो. प्रत्येक धर्मात क्षमाशीतलेचा पुरस्कार केला आहे.

## का झाली राधा-कृष्णाची ताटातूट?

जाणून घ्या

राधा आणि कृष्ण यांच्या प्रेमाची उदाहरणं दिली जातात. मंदिरांमध्ये राधा-कृष्णाची मूर्ती आढळते. कृष्णासोबत राधेचं नाव जोडलं जातं. कृष्ण राधेचा सखा पण कृष्णाने राधेशी विवाह केला नाही. एवढं प्रेम असूनही त्याने राधेला दूर ठेवलं. कृष्ण म्हणजे साक्षात परमेश्वर. पण



आपल्या प्रेयसीशी त्याचं मिलन झालंच नाही. कृष्णाने राधेशी विवाह का केला नाही, याचं कुतुहल भक्तांना वाटत आलंय. यामागे काही कारणं आहेत. त्याविषयी जाणून घेऊ...

श्रीकृष्णाला बांधून ठेवलेलं असताना त्याची आणि राधेची पहिली भेट झाली. या प्रसंगाबाबत श्रीकृष्णाने माता यशोदेला सांगितलं. तो म्हणतो, एक मुलगी माझ्याजवळ आली. तिने माझ्याकडे पाहिलं. तेव्हापासून मीच तिच्या जीवनाचा आधार बनून गेलोय. आपण राधेशी लग्न करणार असल्याचं श्रीकृष्णाने यशोदेला सांगितलं. पण यशोदेला हे मान्य नसतं. 'राधा तुझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठी आहे. ती साधी गवळण आहे. त्यातच तिचा साखरपुडा दुसऱ्या मुलाशी झालाय. त्यामुळे ती तुझ्यासाठी योग्य नाही', असं यशोदा त्याला सांगते. राधेशी लग्न करण्याच्या कृष्णाच्या हट्टाबाबत नंदाला कळल्यानंतर त्याने श्रीकृष्णाला गुरू गर्गाचाऱ्यांकडे नेलं. त्यावेळी 'तुझ्या आयुष्याचा मूळ उद्देश वेगळा आहे' असं गुरूंनी श्रीकृष्णाला सांगितलं. तू मुक्तीदाता आहेस, या संसाराचा तारणहार आहेस. भक्तांना त्यांच्या संकटातून मुक्त करण्याची मोठी जबाबदारी तुझ्यावर आहे, या शब्दात गुरूंनी कृष्णाला समजावलं. या कारणांमुळे श्रीकृष्ण आणि राधा यांचा विवाह होऊ शकला नाही पण राधा आणि कृष्ण यांचं नाव एकमेकांशी जोडलं गेलं ते कायमचं.

## घरात ठेवा फायर मंकी

वास्तू भक्ती

फेंगशुई शास्त्रात विविध वस्तूंचा वापर करून वास्तूविषय लाभ मिळवण्याबाबत सांगण्यात आलंय. म्हणूनच लाफिंग बुद्धा, विंड चाईम, धातूचा बेडूक, कासव अशा वस्तू घरात ठेवल्या जातात. यासोबत फायर मंकी हा प्रकारही लोकप्रिय ठरतोय. सकारात्मक ऊर्जा आणि कल्पकता यांचा स्रोत म्हणजे फायर मंकी. चीनमध्ये याचं फार महत्त्व आहे. फायर मंकीच्या उपयुक्ततेविषयी...

* फायर मंकी वेगवेगळ्या स्वरूपात उपलब्ध आहे. चेन, लॉकेट, ब्रेसलेट म्हणूनही त्याचा वापर करता येईल. दागिन्यांमध्ये याचा वापर करत असाल तर पिवळ्या धातूचा फायर मंकी बनवून घ्या.

* फायर मंकी घरातही ठेवता येईल. फायर मंकीचं स्थान निश्चित करा. जागेवरून हलवू नका.

* फायर मंकीचं चित्रही लावता येईल. थ्रीडी स्वरूपाच्या चित्राला प्राधान्य द्या. बाहेरच्या बाजूला झुकलेला फायर मंकी अधिक प्रभावी ठरू शकेल.



* स्मार्टफोनचं ऑनलाईन बॅक कव्हर म्हणूनही फायर मंकी ठेवता येईल. या डिझाइनची बॅककव्हर लोकप्रिय ठरत आहेत. ऑनलाईन साईट्सवरून अशी बॅककव्हर्स खरेदी करता येतील.

* फायर मंकीमुळे घरातली नकारात्मक ऊर्जा दूर होते. पण इतर काही उपायांनीही घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रभाव वाढवता येईल.


* नकारात्मक ऊर्जा घरातल्या विविध वस्तूंमध्ये सामावलेली असते. घरातलं फर्निचर, भिंती यांमध्येही नकारात्मक ऊर्जेचा वास असतो. त्यामुळे भाड्याच्या घरात प्रवेश करत असाल तर घराला रंग द्या. तसंच प्रवेशाआधी घराची फरशी मिठाच्या पाण्याने पुसून घ्या.

* सूर्याच्या किरणांमुळे घरातली नकारात्मक ऊर्जा बाहेर पडते. त्यामुळे घरात प्रकाश येईल, असं बघा. दारं, खिडक्या उघडी ठेवा. घरात हवा खेळती राहील, यासाठी प्रयत्न करा.

* मिठामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करत नाही. त्यामुळे घर मिठाच्या पाण्याने पुसून घ्या. महिन्यातून एकदा हा प्रकार करा. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहिल आणि तुम्हाला उत्साही आणि आनंदी वाटेल.

## भयगंड दूर सारा

**आज प्रत्येकाला भयगंडाने ग्रासलंय. प्रत्येकाला असुरक्षित वाटतंय. जीवनाच्या स्पर्धेत टिकून राहताना आपलं काय होणार, या प्रश्नाने प्रत्येकाला सतावलंय. ही भीती अनाठायी आहे. तुमच्या मनातही असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असेल तर ती या उपायांनी दूर करता येईल.**



सेल्फ हेल्प

स्वत:ला कधीही असुरक्षित मानू नका. असुरक्षिततेची भावना मनातून काढून टाकायला हवी. आपल्या आयुष्यात अनेक समस्या असतात पण घाबरून चालत नाही. या जगात परमशक्ती परमात्मा आहे. या परमात्म्याचं तुमच्याकडे लक्ष आहे आणि तो तुम्हाला मार्ग दाखवणार आहे हा विश्वास कायम मनात ठेवा.

* या परमशक्तीशी आपण जोडलं गेलं पाहिजे. असुरक्षितेची भावना निर्माण झाली की मनाला न पटणाऱ्या गोष्टी माणसाच्या हातून घडू लागतात.

* असुरक्षितता कोणाबद्दलही निर्माण होऊ शकते. मित्र-मैत्रीण, सहकारी आपल्याला असुरक्षितपणाची जाणीव करून देतात. कार्यालयातला सहकारी पुढे गेला की आपल्याला असुरक्षित वाटू लागतं. मित्र किंवा मैत्रिणीला चांगले गुण मिळाले की आपण स्वत:ला असुरक्षित मानतो. आपण स्वत:चे गुण ओळखले पाहिजेत. प्रत्येक माणूस वेगळा आहे. त्यामुळे आपण आपल्या मार्गाने पुढे जायला हवं. असुरक्षिततेची भावना माणसाला अविवेकी बनवू शकते. यातूनच हत्या केल्या जातात. चोरी केली जाते. एखाद्याला मागे खेचण्याचे प्रयत्न होतात.

* इतरांवर कुरघोडी करण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी स्वत:च्या क्षमता वाढवता येतील. यासाठी परिश्रम घेता येतील. आपली ऊर्जा स्वत:ला विकसित करण्यासाठी वापरता येतील. त्यामुळे असुरक्षिततेची भावना नष्ट होण्यास मदत होईल. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे परमेश्वराला कधीही विसरू नका. त्याचं स्मरण करा. तो तुम्हाला योग्य मार्ग दाखवेल. नामस्मरणात अनोखा आनंद आहे. तो मिळवा. परमेश्वराच्या जवळ गेल्यावर असुरक्षितता दूर होईल.

## थामुमानावर मंदिर




तीर्थक्षेत्र

भारतातल्या प्रत्येक मंदिराचं एक वैशिष्ट्य आहे. या मंदिरांबाबत बरंच काही बोललं जातं. तमिळनाडूतल्या तिरूचिरापल्लीमध्येही असंच अनोखं मंदिर आहे. थामुमाना स्वामी मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. स्थानिक लोक या मंदिराला थायुमानावर असंही म्हणतात. थामुमाना स्वामी हे शंकाराचं मंदिर आहे. तमिळनाडूत भगवान शंकराला थामुमानावर असं म्हटलं जातं. याच नावाने त्याची पूजा केली जाते. थायुमानावर म्हणजे भक्तरक्षणासाठी आईचं रूप धारण करणारा.

या मंदिराबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, दानगुप्त नावाचा व्यापारी आपली पत्नी रत्नावलीसोबत रहात होता. दक्षिण भारतातून वाहणाऱ्या कावेरी नदीच्या उत्तरेकडे असलेल्या नगरात हा व्यापारी रहात असे. पती-पत्नी भगवान शंकराचे भक्त होते. गरोदर असताना रत्नावली भगवान शंकराचं दर्शन करायला गेली होती. त्यावेळी जोराचा पाऊस आला. अशा वेळी तिने मंदिरातच थांबण्याचा निर्णय घेतला. त्याच वेळी रत्नावलीच्या पोटात दुखू लागलं. ती वेदनांनी कळवळली. यावेळी तिने शंकराची आराधना केली. रत्नावलीच्या आईचं रूप घेऊन भगवान शंकर तिच्याजवळ आले. प्रसूतीदरम्यान तिला सगळी मदत केली. रत्नावली बाळंतीण झाली. सगळं काही सुखरूप पार पडलं. त्यानंतर रत्नावलीची आई तिच्याकडे आली. तोपर्यंत भगवान शिव अंतर्धान पावले होते. भगवान शंकर आईच्या रूपात आपल्याकडे आले होते, हे रत्नावलीच्या लक्षात आलं. तिने शंकराचे आभार मानले. त्यामुळे गरोदर स्त्रिया या मंदिरात येतात. आपल्या बाळाच्या आयुरारोग्याची कामना करतात. श्रद्धा आणि भक्तीने आपली सेवा करणाऱ्या भाविकांना भगवान शंकर उत्तम फळ देतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.


## शोधू या जीवनाचा अर्थ

भक्ती आणि बोध

८४ लक्ष योनींमधून फिरून आल्यानंतर आपल्याला माणसाचा दुर्लभ जन्म मिळतो. मनुष्यजन्मात आपण बरंच काही करू शकतो. आपल्याला काही उद्देशाने पृथ्वीवर पाठवण्यात आलंय, याचा माणसाला विसर पडतो. दैनंदिन आयुष्यात रमताना तो आपला मूळ उद्देशच विसरून जातो. दैनंदिन आयुष्यात आपण अनेक कामं करतो. काही कामांचे अर्थ असतात तर काही कामं पूर्णपणे निरर्थक ठरतात. एखादा उद्देश समोर ठेऊन केलेली कार्यं सार्थक मानली जातात. सार्थक कार्यांचं फळ आपल्याला मिळत असतं. या कार्यांचं एकत्रित फळ आपल्याला मिळतं. कोणतंही कार्य करताना त्यात निष्ठा आणि श्रद्धा असली पाहिजे. तरच त्या कार्याला काही अर्थ प्राप्त होतो. निरर्थक कार्यांचा आपल्याला काहीही लाभ होत नाही. या कार्यांचं फळही मिळत नाही.

मनुष्याची प्रत्येक कृती म्हणजे त्याची कर्मं. काही कर्मं निरर्थक असतात तर काही सार्थकी लागतात. परमेश्वराला आठवून, त्याचं स्मरण करून केलेलं कार्य सफल होतं. या कार्यात कोणत्याही अडचणी येत नाहीत. अशा कार्यांमध्ये 'मी'पणाची भावना नसते तर मनात वृथा अभिमान बाळगून केली जाणारी कार्यं निष्फळ ठरतात. ही कार्यं सिद्धीस जात नाहीत. अभिमान, अहंकार यांचा कायमच नि:पात झालाय. रावण, कंस, हिरण्यकश्यपु ही या अहंकाराचीच उदाहरणं मानली जातात. या जगात अहंकारी माणसं टिकू शकत नाहीत. त्यांचं अध:पतन होतं. काही काळ सुख भोगलं तरी त्यांच्या नशिबी दु:ख येतं. अनेक भ्रष्टाचारी राजकारण्यांना पडत्या काळात तुरूंगवास होतो. त्यांचं अस्तित्त्व संपतं. अशी अनेक उदाहरणं आपण आसपास बघतो.

आपल्या प्रत्येकाचं आयुष्य सार्थकी लागलं पाहिजे. भोगवादी, विलासी आयुष्याला काहीही अर्थ नसतो. आयुष्यात कर्म करत राहिलं पाहिजे. या कर्मांमुळे आयुष्याला अर्थ प्राप्त होतो. अन्यथा, आयुष्य पशुसमान मानलं जातं. प्रत्येकाने आयुष्याचा मूळ उद्देश लक्षात घेतला पाहिजे. या उद्देशासाठी झटलं पाहिजे. हाच मोक्षाचा खरा मार्ग आहे. गीतेत कर्मवादाचा सिद्धांत सांगितलाय. आपल्या दैनंदिन आयुष्यातल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. ही कर्तव्यं पार पाडणं म्हणजे कर्म असं म्हणता येईल. युगानुसार कर्माची व्याख्या बदलली असली तरी त्याचं महत्त्व आजही कमी झालेलं नाही. त्यामुळे आपण कुणीही आयुष्याच्या मूळ उद्देशापासून दूर जाऊ नये.



# फार्मा उद्योगात रोजगाराच्या अनेक संधी : ना. गडकरी

## सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसीचा पदवीदान सोहळा







■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
फार्मा उद्योगात अनेक नवे संशोधन होत आहेत. या क्षेत्रातील शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील नवीन प्रयोगांवर आणि संशोधनांवर भर देण्याची गरज आहे. नागपुरात मोठ्या प्रमाणात फार्मा उद्योग येत आहेत. अनेक कंपन्यांचे काम सुरू झाले असून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री शनिवारी केले.

नागपूरच्या लोणारा स्थित सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या औषध निर्माण शास्त्रच्या अंतिम बॅचचा पदवीदान सोहळा वनामतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. त्यावेळी गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला यावेळी हिमाचल प्रदेशचे तंत्र शिक्षण मंत्री राजेश धमार्णी, मुंबईतील अंजुमन इस्लाम संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर काझी, प्रसिद्ध अस्थिरोगतज्ञ डॉ. संजीव चौधरी, माजी मंत्री अनिस अहमद आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नागपुरात फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज (औषध निर्माण उद्योग) वाढत आहे. यामध्ये फार्मसीच्या विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. या विद्यार्थ्यांनी विद्वत्ता आत्मसात करण्यासोबतच उद्यमशीलतेची कास धरून नोकरी देणारे तसेच रोजगार निर्माते बनावे. विदर्भाच्या आर्थिक विकासात योगदान द्यावे, असे आवाहन नितीन गडकरी यांनी केले.

गडकरी म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला वाघिणीचं दूध म्हणाले होते. शिक्षणामुळे केवळ एका विद्यार्थ्याचा विकास घडून येत नाही तर त्यामागे संपूर्ण कुटुंबाचा आणि समाजाचा देखील विकास होतो. एवढे सामर्थ्य ज्ञानामध्ये आहे.

कोणतीही व्यक्ती तिच्या जाती-धर्माच्या आधारावर मोठी होत नाही. तर गुणांच्या आधारावर मोठी होते. त्यामुळे मुस्लिम समाजातील तरुणांनी उच्च शिक्षण घेऊन समाजाची सेवा करावी, असे आवाहन गडकरी यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी आणि पालकही उपस्थित होते.

# एखाद्याचा खून केला तर असाच तर्क मांडणार का?

### वडेट्टीवारांचा सवाल



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १५ :**
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नाशिक सत्र न्यायालयाने कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती देताना नोंदवलेल्या एका निरीक्षणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. उद्या एखाद्याने खून केला तर कोर्ट त्याला शिक्षा ठोठावताना असाच तर्क मांडणार का? असे ते म्हणालेत.

माणिकराव कोकाटे यांना मुख्यमंत्री कोट्यातून गैरमार्गाने सदनिका मिळवल्याप्रकरणी २ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. यामुळे त्यांच्या आमदारकीवर टांगती तलवार उभी राहिली होती. पण नाशिक कोर्टाने त्यांच्या या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोर्टाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती देताना कोर्टाने कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघात पुन्हा निवडणूक घेण्याची वेळ येईल, यामुळे जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नोंदवले होते.

विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना कोर्टाच्या या निर्णयावर तीव्र संताप व्यक्त केला. कोणताही गुन्हेगार असेल आणि तो शिक्षेस पात्र असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. निवडणुकीचा खर्च वाढेल म्हणून आम्ही त्यांना माफ करतो ही कोर्टाची भूमिका अत्यंत हास्यास्पद आहे. न्यायालय असे वागणार असेल तर न्यायाची अपेक्षा कुणाकडून करायची? उद्या एखाद्याने खून केला तर कोर्ट त्याला शिक्षा ठोठावताना असाच तर्क मांडणार का? असे ते संतप्त सूर आळवत म्हणाले.

**नाना पटोलेंनी प्रस्ताव देताना घाई केली**

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. आमच्याकडे या, आम्ही पाठिंबा देऊ, असे ते म्हणालेत. विजय वडेट्टीवार यांनी पटोले यांनी हा प्रस्ताव सादर करताना घाई केल्याचे मत व्यक्त केले. नाना पटोले यांनी काय ऑफर दिली हे मी माध्यमांतून पाहिले.

राजकारणात कुणीच कुणाचा मित्र किंवा शत्रू नसतो. राजकारण वेळेनुसार चालते. त्यामुळे उद्या काय वाढून ठेवले आहे हे आत्ताच सांगता येत नाही. पण यांची आत्ताची ओढाताण पाहता पुढे काय होईल हे सांगता येत नाही. मात्र नाना पटोले यांनी हा प्रस्ताव ठेवताना थोडी घाई केली एवढेच माझे म्हणणे आहे, असे ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी हिंदुत्त्वाच्या मुद्यावरून चर्चेत आलेल्या मंत्री नीतेश राणे यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, नीतेश राणे हा संधीसाधू माणूस आहे. त्याला योगी आदित्यनाथ बनायचे आहे किंवा काय हे मला माहिती नाही. पण भाजपच्या काही प्रस्थापित नेत्यांसाठी त्यांचे असे बोलणे ही धोक्याची घंटा असल्याचे विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले.

# सुनेवर विजेचा शॉक देऊन हल्ला

### सासू-सासऱ्याकडून कर्मचारी तरुणीचा जीव घेण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
नागपुरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत धक्कादायक घटना घडली आहे. सासू-सास ?यांनी आपल्या सुनेला विजेचा शॉक देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. जयताळा मार्गावरील अष्टविनायकनगर येथे ही घटना घडली.

टीसीएस कंपनीत कार्यरत असलेल्या प्रीती स्वप्निल चिव्हाणे (५३) यांच्यावर त्यांचे सासरे भानुदास चिव्हाणे (६५) आणि सासू माया चिव्हाणे (६३) यांनी हल्ला केला. सध्या प्रीती यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रीती यांचा पती स्वप्निल वैद्यकीय उपकरणांचा व्यवसाय करतो. दोघांचा प्रेमविवाह झाला होता. मात्र एक वर्षापूर्वी स्वप्निलचे परस्त्रीशी असलेले संबंध प्रीतीच्या लक्षात आले. त्यांनी हा विषय कुटुंबीयांसमोर मांडला. नातेवाईकांनी स्वप्निलची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने ऐकले नाही.

त्यानंतर गेल्या वर्षभरापासून चिव्हाणे कुटुंबीयांकडून प्रीतीचा शारीरिक व मानसिक छळ सुरू झाला. १ मार्चला प्रीतीने पोलिसांत तक्रार केली. याचा राग धरून १० मार्चला रात्री साडेआठच्या सुमारास कामावरून घरी आलेल्या प्रीतीला सासऱ्यांनी शिवीगाळ केली.

प्रीती वरच्या मजल्यावर जात असताना सासू-सासऱ्यांनी तिचा हात पकडून विजेचा शॉक दिला. घाबरलेल्या प्रीतीने स्वतःची सुटका करून घेतली. मात्र दोघांनी तिचे केस पकडून तिला खाली ओढले आणि मारहाण केली. तिच्या आरडाओरडीने धावून आलेल्या शेजाऱ्यांनी व नातेवाईकांनी तिला रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## औरंगजेबाच्या कबरीविरोधात विहिप-बजरंग दलाचा इशारा

### १७ मार्चला राज्यभर आंदोलन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**
औरंगजेबाची कबर आमच्या गुलामगिरीची, लाचारीची, आणि अत्याचारांची आठवण करून देते. महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर ही कबर काढावी. अन्यथा, बजरंग दल रस्त्यावर उतरेल, आंदोलन करेल, असा इशारा विहिंप आणि बजरंग दलाने दिला आहे. सोमवार, दिनांक १७ मार्च रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी आंदोलन करून मुख्यमंत्री यांच्या नावे निवेदन देणार आहोत, अशी माहिती विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्यावतीने देण्यात आली.
यावेळी विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन, आणि प्रांत सह संयोजक संदेश भेगडे उपस्थित होते.

# संजय राऊतांनी सकाळचा शिमगा बंद करावा

### बावनकुळे यांचा इशारा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १५ :**
उद्धव ठाकरेंनी दररोज सभागृहात यावे तर संजय राऊतांनी त्यांचा सकाळचा सिमगा वर्षभरासाठी बंद करावा आणि महाराष्ट्रातील सरकारला विकासासाठी सूचना द्याव्यात, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, नाना पटोले यांना माझ्या शुभेच्छा आहेत. त्यांना विरोधी पक्षात बसण्याचा कौल जनतेने दिलेला आहे. महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी आणि पारदर्शी व भ्रष्टाचारमुक्त सरकार चालण्यासाठी होळीच्या निमित्ताने नाना पटोलेंनी संकल्प करावा अशा माझ्या त्यांना शुभेच्छा.

बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांना माझी विनंती आहे की त्यांनी दररोज सभागृहात यावं. सभागृहात येऊन राज्य सरकारला चांगल्या गोष्टी सांगाव्या. कारण उद्धव ठाकरे हे फक्त कधीतरीच सभागृहात येतात असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे यांना खोचक सल्ला दिला आहे.

**विकासासाठी सूचना द्याव्यात**

बावनकुळे म्हणाले की, संजय राऊत यांना माज्या शुभेच्छा आहेत की ते दररोज सकाळी 9 वाजता जे खोचक टोले लगावतात. त्यांचा तो दररोजचा शिमगा त्यांनी वर्षभरासाठी बंद करावा आणि महाराष्ट्रातील सरकारला विकासासाठी सूचना द्याव्यात. विजय वडेट्टीवारांनी महाराष्ट्रातील प्रश्न मांडले पाहिजेत. काँग्रेस पक्ष मजबूत करण्याची काळजी त्यांनी घ्यावी, असेही ते म्हणाले.







■ **नागपूर :** *होळीचा सण देशभरात गुरूवारी साजरा करण्यात आला. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी धुलीवंदनानिमित्त सर्वांनी रंगाचा आनंद लुटला. नागपूर शहरही रंगात न्हावून निघाले होते.*

# नादुरुस्त ट्रकला बसची धडक

### वाहक ठार, प्रवासी जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर दि. १५ :**
नादरुस्त ट्रकला बसने दिलेल्या धडकेत कंडक्टरचा मृत्यू झाल्याची घटना नागपूर - चंद्रपूर महामार्गावरील पडोली येथील हायटेक फार्मसी कॉलेजपुढे घडली. या घटनेत बस वाहकाचा मृत्यू झाला. ११ ते १२ प्रवासी जखमी झालेत. त्यापैकी ३ जणांची प्रकृती अत्यवस्थ आहे.

बस नागपूरहून चंद्रपूरकडे जात होती. शुक्रवारी मध्यरात्री बसने एका नादुरुस्त ट्रकला धडक दिली. या धडकेत कंडक्टरचा जागीच मृत्यू झाला असून, इतर अनेक प्रवासी जखमी झालेत. संदीप वनकर असे मृत वाहकाचे नाव आहे.

जखमींना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी ट्रक ड्रायव्हरवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. ट्रक ड्रायव्हरने सुरक्षेचे कोणतेही नियम न पाळता आपला नादुरुस्त ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा केल्यामुळे ही घटना घडली. दरम्यान, या अपघातातील जखमी प्रवाशांवर विविध रूग्णालयामध्ये उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

# सेंट्रल बँक शाखेला भीषण आग



कागदपत्रांसह सर्व पैसे जळून खाक
शॉर्ट सर्किटने आगीची घटना
जीवितहानी नाही

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. १५ :**
जिल्ह्यातील चांदूर रेल्वे येथील सेंट्रल बँकेच्या शाखेला आज दुपारी भीषण आग लागली. या आगीत बँकेतील लाखो रुपये किंमतीच्या नोटा व साहित्य जळून खाक झाले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची माहिती आहे.

सेंट्रल बँकेच्या चांदूर रेल्वे येथील शाखेत नियमित कामकाज सुरू असताना शनिवारी दुपारी एका ठिकाणाहून अचानक धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. हे पाहताच बँकेत एकच धावपळ सुरू झाली.

ग्राहक व बँकेतील कर्मचारी लगेच बाहेर पडले. त्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी या आगीची माहिती चांदूर रेल्वे परिषदेच्या अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निबंबांनी ही आग आटोक्यात आणण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न केले. त्यानंतरही ही आग आटोक्यात येत नव्हती. त्यामुळे तिवसा व धामणगाव रेल्वे येथील अग्निबंबांनाही पाचारण करण्यात आले होते.

प्राथमिक माहितीनुसार, बँकेच्या एसीमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे ही आग लागली. आगीत नेमके किती नुकसान झाले हे स्पष्ट झाले नाही. पण सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

तूर्त या घटनेत बँकेतील कॅश काऊंटरमधील रोकड, महत्वाची कागदपत्रे व फर्निचर जळून खाक झाल्याचा अंदाज आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी तत्काळ पोहचून बंदोबस्त वाढवला.

## औरंगजेबाच्या थडग्यावरून राजकीय रणकंदन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
औरंगजेबाच्या थडग्याच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजप आमदार अतुल भातखलकर यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल करत औरंगजेबाची कबर सजवण्याची आवश्यकता काय? असा सवाल उपस्थित केला. विरोधक केवळ मुस्लिम मतदारांना खूश करण्यासाठी असे करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

अतुल भातखलकर म्हणाले, ҂विरोधकांनी इतकी वर्षे छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास लपवण्याचे पाप केले. मात्र, आता हिंदू समाज जागृत झाला आहे. जर विरोधकांनी औरंगजेबाचे थडगे वाचवण्याचा अधिक प्रयत्न केला, तर हिंदू समाज त्या थडग्यात तुम्हालाच पुरल्याशिवाय राहणार नाही! शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी हिंदुत्वावर भाष्य करण्यापूर्वी, स्वतःच्या महाविकास आघाडीतील नेत्यांनी औरंगाबादला ह्यछत्रपती संभाजीनगर म्हणायची हिंमत दाखवावी, असा टोला भातखलकर यांनी लगावला.

त्यांनी पुढे म्हटले, उद्धव ठाकरे गट महानगरपालिकेत प्रकाश आंबेडकरांसोबत युती करण्याच्या तयारीत आहे. हेच प्रकाश आंबेडकर औरंगजेबाच्या थडग्यावर जाऊन फुले वाहतात. यावर दानवेंनी आधी भूमिका स्पष्ट करावी आणि मग भाजप-शिवसेनेवर बोलावे.

भातखलकर म्हणाले, असा खोटा इतिहास लोकांनी नाकारला आहे. अफजलखानाची आणि औरंगजेबाची कबर नष्ट केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. दरम्यान, यावरून पुन्हा वाद पेटण्याचे संकेत आहेत.


## श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ,वणी

### सोनेतारण जाहीर लिलाव नोटीस

**श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.वणी सोने** तारण **शाखा - चंद्रपूर** कार्यालय खालील नमुद केलेले खात्यांचे **सोने तारण** कर्जदार यांना वारंवार मुदत संपलेचे पत्र रजिष्ट्रर ए.डी.,मोबाईलवर मेसेज व्दारे/समक्ष भेट देऊन नोटीस दिली आहे. तरीही त्यांनी मुदतीत कर्ज परतफेड केलेली नाही अथवा खाते नुतणीकरण केले नाही. खालील थकबाकीदाराकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांचे कर्जाचे तारणापोटी ठेवलेल्या दागिण्यांचा जाहीर लिलाव सोमवार दि.२४/०३/२०२५ रोजी खालील नमुद ठिकाणी शाखा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी नमुद केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. मात्र लिलावाचे पुर्वी थकीत कर्जदाराने कर्जफेड वा कर्ज नुतणीकरण केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. लिलाव स्थगित ठेवणे व लिलाव मुदत वाढ देणे,रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवले आहेत.

शाखा – राजुरा,चिमूर

| अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | लिलावाची दिनांक व वेळ लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | १२०००१८५ | लोहकरे विजय सदाशिव | **शाखा - चिमूर** उमरेड रोड, चिमूर, जिल्हा चंद्रपूर वेळ :०१ .०० वा. वार – सोमवार दि.२४-०३-२०२५ |
| ३ | १२०००२३८ | डाहुले दिवाकर नत्थुजी | |
| ५ | ९०००४५० | पिंदुरकर लक्ष्मण मनोहर | |

**लिलावाच्या अटी शर्ती :-**
१) लिलावात भाग घेणारास रु.५,०००/-रोख भरुन भाग घ्यावा लागेल.
२) लिलाव मंजूर,नामंजूर किंवा स्थगित करणेचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.
३) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखविण्यात येतील.

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या,वणी